मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा



संपादक :
वा. ना. देशपांडे

री १९४८ ★ किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

★ फेब्रुवारी अंक ★

अनुक्रमणिका

* * *

१ सोहळा (कविता)-सौ. पद्मा, बी. ए. ३३
२ हिंदीचे तरुण कवि 'अंचल'-शरच्चंद्र मुक्तिबोध, एम्. ए. ३६
३ कथाकाव्य–प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए. ४०
४ एकाकिनी (कविता)–बी. रघुनाथ ५०
५ हिंदी कादंबरी सौ. लीला दुबे ५१
६ अजून हृदयें जोंवर असतीं (कविता)-द्वारकानाथ चित्रे ५७
७ चंद्रप्रकाश–द. चिं. सोमण ५८
८ भिडले होते नभा (कविता)–ना. ना. हूड, बी. ए, एल्एल् बी. ६३
९ केशवसुतांची स्वप्नसृष्टि–श्रीराम अत्तरदे, एम्. ए. ६४
१० साहित्य समालोचन ७३
११ संघवार्ता ७५
१२ संपादकीय ७६

●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

सोहळा

* * *

स्वतंत्रतादेवी । मंदिरीं येई
आनंद कोंदला । दिशांत दाही. १

गर्जत चौघडा । वाजे सनई
शोभती तोरणें । हीं ठायीं ठायीं ! २

गर्वानें फडके । उंच निशाण
ब्रह्मांडाला जणू । देई आव्हान ! ३

अर्धचंद्र आणि । धर्मचक्राचे
दिंड्या, मेळे उभे । कोटि भक्तांचे. ४

स्वातंत्र्यदेवीच्या । पूजनासाठीं
मंदिरीं भक्तांची । जाहली दाटी ! ५

" स्वातंत्र्यदेवीचा । बोला हो जय !
धर्ममंदिरांचा । होवो विजय ! " ६

—घोष नच विरे । जों अंतराळीं
कोठूनी कानांत । घुसे किंकाळी ? ७

—आक्रंदत येई । सुंदरी कोणी
स्वातंत्र्यदेवीच्या । पडे चरणीं ! ८

" आई ! आई ! तुझ्या । मंगलागमीं
हुताशमी पेटे । माझिया धामीं ! ९

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांग आई ! कसें । पूजन करूं ?
रक्ताची का धार । चरणी धरूं ? १०

नवीन संस्कृति । मानवतेची
शांततेची आणि । समानतेची— ११

कल्पून तुझिया । रम्य मूर्तीत
पूजनासी आलें । आई ! धावत ! १२

पाहूनिया परी । तऱ्हा पूजेची
शतखंडें झालीं । माझ्या पूजेचीं ! १३

तुझ्या भक्तीनेच । उन्माद आला
भाऊ भावाचाच । कापितो गळा ! १४

पुत्र हे एकाच । मायभूमीचे
वैरी काय झाले । शत जन्मांचे ? १५

धर्मपिशाच्यांचे । जाहले बळी
शिकाऱ्यांनी केली । सिंहाची शेळी ! १६

निरपराध्यांचीं । शिरकमलें
वाहूनिया पद । तुझे पूजिले ! १७

निष्पाप रक्ताचें । चंदन भालीं
लावूनिया भक्ति । कृतार्थ झाली ! १८

बांधवांचीं घरें । पेटवूनिया
उजळिल्या तुझ्या । दीप–समया ! १९

बाळ–मुखांतून । घास काढून
प्रसाद का तुझा । दिला वाटून ? २०

ओढूनिया वस्त्र । माझ्या देहींचें
रोविलें निशाण । तुझ्या कीर्तीचें ! २१

वीरप्रसू पुण्य । पंजाबभूमी
निर्जन स्मशान । तुझ्या आगमीं ! २२

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहिलीं सिंधूने । अनंत रणें
जळ रंगे तिचें । शत्रु-रक्ताने ! २३

स्वकीयांचा वध । करूनि आज
चढविला निज । रक्ताचा साज ! २४

हाच का देवते ! । तुझा सोहळा ?
वरप्रसाद का । शाप जाहला ? २५

पेटला अंगार । आई ! मनांत
सांग तुझें कसें । करूं स्वागत ? २६

पाहूं का कसोटी । देवपणाची ?
किंवा दावूं तुज । माझ्या मनाची ? ” २७

—दुःखावेगें होई । वेडी रमणी
घावली खंजीर । करीं घेवोनी २८

दीपज्योतीमधे । लकाके सुरी
क्षणांत विसावे । रमणी-उरीं ! २९

रक्ताचीं कारंजीं । नभीं उडालीं
भरला गाभारा । मूर्ति बुडली ! ३०

× × ×

हाहाःकार उठे । भक्त-जनांत
सोहळा गाजला । त्रिभुवनांत ! ३१

— पद्मा

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

हिंदीचे तरुण कवि 'अंचल'

शरच्चंद्र मुक्तिबोध, एम्. ए.

● हिंदीचे एक प्रमुख पुरोगामी साहित्यिक 'अंचल'—जबलपूरच्या रॉबर्टसन कॉलेजांतील प्राध्यापक श्री. रामेश्वर शुक्ल यांचा 'कवि' या नात्याने परिचय नवोदित कवि रा. मुक्तिबोध यांनी करून दिला आहे. 'अंचल' यांचे 'मधूलिका,' 'अपराजिता,' 'किरणवेला,' 'करील,' 'लालचूनर' हे काव्यसंग्रह आणि 'साहित्य और समाज' हा प्रबंध प्रसिद्धच आहे.

* * *

कवि अंचल यांचें स्थान आधुनिक हिन्दी कवितेंत महत्त्वाचें आहे. गेलीं दहा वर्षे त्यांनी सतत काव्यलेखन केलें असून त्यांच्या कवितेने कांही दिवस हिन्दी वाचकांना वेड लावलें होतें. त्यांच्या कवितेचें मर्म आणि महत्त्व समजण्यास आधुनिक हिन्दी कवितेची माहिती करून घेणें अवश्य आहे.

इतर प्रांतीय भाषांतून ज्या वेळी जुन्या काव्याचा ऱ्हास सुरू झाला, त्यावेळी परिस्थिति जवळ जवळ सारखी होती. समग्र भारताचें जीवन पूर्णत: खिळखिळें होऊन गेलें होतें, आणि भारताचा शासकवर्ग अत्यंत विलासी व निष्ठाशून्य असा झालेला होता. अशा दरबारांतूनच कवि लोक आपलीं काव्यें गात होते व दरबारी लोकांची हौस पुरवीत होते. साहजिकच काव्यामागील उदात्त भावना नष्ट होऊन निवळ स्थूल, भौतिक अशा शृंगार-चेष्टांनाच अधिक महत्त्व आलें ! या ऱ्हासकालांत हिन्दी काव्यांत दोन प्रवृत्ती प्रमुख होत्या; पहिली प्रवृत्ति भक्तिकाव्याची आणि दुसरी शृंगारकाव्याची. परंतु दोन्ही काव्यधारांच्या मागचा प्रेरक हेतु शृंगार हाच होता आणि त्यांचें स्वरूपहि जवळ जवळ सारखेंच होतें. राधाकृष्णविषयक भक्तिकाव्याचें रूपांतरहि बीभत्स शृंगारचेष्टांत झालेलें होतें व शृंगारकाव्यांत तर जाणूनबुजून या विषयाला वाव असल्याने त्या ठिकाणीं तर त्याची रेलचेल होतीच. हिंदी काव्यांतील या ऱ्हासकालांत दरबारी कवि नायकनायिकांच्या मीलन—विरहाचीं गाणीं त्यांच्या नखशिखांचीं वर्णनें व ऋतुचर्यादि गोष्टींतच दंग होते व त्यांतच आपलें कौशल्य दाखवीत होते. मराठी दरबारांत लावणी या कविता-प्रकाराचा अतिरेक झाला होता, त्याप्रमाणेंच व त्याच कालांत हिंदी, 'रीति काव्य'हि शृंगाराच्या डबक्यांतच कुजत पडलें होतें. भोग हाच त्या काव्याचा स्थायीभाव होता. अत्यंत मधुर अशा व्रजभाषेंतच हें काव्य लिहिलें जात होतें. नवीन राष्ट्रीय जागरणाबरोबर या सर्व परिस्थितींत प्रचंड बदल घडून आला.

हिन्दी रसिक व कवि जुन्या प्रेमाच्या रंगीबेरंगी पिचकाऱ्यांस पूर्णतः विटले होते. नायिकेच्या त्याच-त्याच वर्णनांचा त्यांना तिटकारा येऊं लागला होता ! व्यक्तिजीवन व समाजजीवन यांकडे—नवीन ज्ञानामुळे—पाहाण्याचा एक आस्थापूर्ण दृष्टिकोन तयार झालेला होता. नव्या राष्ट्रीय चेतनेवर जीवनाकडे पाहावयाची जी आस्थापूर्ण वृत्ति उदयास आली, ती हिन्दी काव्यांत दोन निरनिराळ्या रूपांत उदयास आली; जुन्या विलासपूर्ण रीतिकाव्याच्या विरुद्ध विद्रोह निरनिराळ्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवींनी निरनिराळ्या रीतींनी प्रकट केला. कांही दिवसांनंतर महाकवि मैथिलीशरण गुप्त यांच्या 'भारतभारती' या काव्यांत नवीन राष्ट्रीय चेतनेचा परमोत्कर्ष दिसून आला. 'रामायणा-' प्रमाणें प्रत्येक हिन्दी घरांतून या काव्याचा पाठ होऊं लागला व राष्ट्रीय काव्याची परंपरा सुरू झाली. परंतु रीतिकाव्याच्या आत्म्याच्या विरुद्ध विद्रोह एका निराळ्या रीतीने प्रकट झाला व तो हिन्दी कवितेच्या विकासाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा ठरला. स्त्रीच्या स्थूल भौतिक सौंदर्याच्या जागीं, गंभीर, आत्मिक व अतींद्रिय अशा सौंदर्याला नव्या कवितेंत प्राधान्य आलें व वैयक्तिक प्रेमाच्या ठिकाणीं महत्तर आध्यात्मिक प्रेमाची स्थापना करून हिन्दी कवितेंत एक नवीन क्रांति सुमित्रानंदन पंत, जयशंकर प्रसाद व 'निराळा' या कवींनी केली. सौंदर्याची, प्रणयाची अशा-रीतीने नवीन मूल्यें या कवींनी हिन्दींत स्थापित केलीं. ब्रजभाषा सोडून खडीबोलींत (आग्रा, मथुरा, दिल्ली इकडे बोलली जाणारी बोली) त्यांनी काव्य-रचना केली व अशा रीतीने हिन्दी काव्याचें संपूर्ण रूपांतर घडून आलें. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर व्यक्तिस्वातंत्र्याचीं मूल्यें व त्यांनी प्रेरित शेले—बायरनादि कवींचीं काव्यें यांच्यामागे जीवनप्रेरणा होती तीच जीवनप्रेरणा व परिस्थिति सरंजामशाहीचा नाश होऊन ब्रिटिशभांडवलशाहीच्या स्थापनेमुळे हिंदुस्थानांत निर्माण झाली व त्यामुळेच त्यांसारख्याच प्रेरणांनी हिंदी काव्य निर्माण झालें. या भांडवलशाही संस्कृतीच्या आगमनाने सरंजामशाही भोगवादाला मूठमाती दिली गेली व एक नवीन व्यक्तिप्रधान आध्यात्मिक प्रीति व अतींद्रिय सौंदर्यकल्पनांनी युक्त अशा 'छायावादी' काव्याचा हिंदींत आविष्कार झाला व त्याप्रकारचें काव्य पंत, प्रसाद, निराला, महादेवी वर्मा यांच्या काव्यांतून पराकोटीला पोचलें.

परंतु परदेशी भांडवलशाहीचें पुरोगामी दान फार लवकर संपलें. शिस्तवार पिळणुकीचा परिणाम दृग्गोचर होऊं लागला आणि हिंदुस्थानला आलेलें सुबत्तेचे कांही दिवस स्वप्नवत् वाटूं लागले. व्यक्तिबद्दल गाईलेलीं गीतें अर्थहीन अशीं वाटूं लागलीं व जीवनाचें रक्त, त्याचें सौंदर्य शोषणाऱ्या जळवांकडे साहजिकच लोकांचें लक्ष लागलें, अध्यात्मप्रीति फोल वाटूं लागून नव्या समन्वयशोधनाची इच्छा चिंतकांच्या मनांत घोटाळूं लागली. एका बाजूस अध्यात्मप्रीतीने व विरल सौंदर्यकल्पनांनी रंगलेलें काव्य, तर दुसऱ्या बाजूस एक निराळीच भीषणवास्तवता व त्यांतून चालणारा मानवाचा लढा व वाट शोधणारे असंतुष्ट तरुण कलावंत— अशा संधिकाळांत 'अंचल' यांनी कविता लिहावयास सुरवात केली.

'अंचल' यांनी अत्यंत विरळ (Aerial) आणि रहस्यवादी प्रेमभावनेला कायमची तिलांजलि दिली व त्याजागीं अधिक मानवीय अशा वास्तविक प्रणयजीवनाची स्थापना केली. महादेवींच्या आध्यात्मिक विरहाच्या जागीं 'अंचल' यांनी वास्तविक स्त्रीपुरुषांच्या विरहाचीं गाणीं गावयास मोठ्या धिटाईने सुरवात केली. अशा रीतीने मध्यवर्गीय तरुणांची प्रचंड लालसा, वास्तविक सौंदर्यमय जीवनाबद्दल उद्दाम अभिलाषा व कधी न विझणारी अशी अदम्य तृष्णा 'अंचल' यांनी आपल्या काव्यांतून प्रकट केली. स्वत:चा परिचय त्यांनी खालीलप्रमाणें दिला—

मै नवयुगकी हलचल लाया,
मस्ती लाया, यौवन लाया !!

नवीन पिढीबद्दलचे त्यांचे उद्गार पहा—

उरमे आग, नयनमे पानी
ओठोंमे मुसकान सजा,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हम हसते इठलाते चलते
इठला इठला बल खा खा
अपनी तरणी फेक प्रलयकी
लहरोंसे खुल खेले हम......इ.

अशा रीतीने 'अंचल' यांनी काव्य लिहावयास सुरवात केल्याबरोबर हिंदी छायावादी काव्यास हादरा बसला! छायावादी काव्याचे महान् प्रवर्तक कवि 'पंत' स्वतःच छायावादाची स्वप्नभूमि सोडून भारतीय जीवनविषयक गीतें गाऊं लागले होते. प्रीतीच्या मानवीकरणाने 'अंचल' यांनी नवीन पुरोगामी मूल्यांच्या स्थापनेस मार्ग मोकळा करून दिला. अत्यंत प्रखर शब्दांत नष्ट यौवनाबद्दल ते गाऊं लागले—

वासना बस कुछ न पूंछो, है विरस निष्फल जवानी
प्रखर अनियंत्रित महाविच्छेद की जलती निशानी
ले प्रलयसी एक आकांक्षा विपुल बरबाद यौवन
मिट रहा अतृप्त वंचित मिल न पाई तुम अचेतन

अशा रीतीने पीडित व दमित वासनेचें प्रत्यक्ष वर्णन 'अंचल' यांनी मोठ्या धिटाईने करून द्यावयास सुरवात केली. नारींचीं रमणीय चित्रें, विनष्ट प्रीति व सौंदर्य यांच्याबरोबर पूजनीया नारीजीवनाची आधुनिक जीवनांतील दुसरी दलित बाजूहि 'अंचल' यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली. खालील चित्र पहा—

और चली तूफान फूंकती वे पथकन्यायें संतप्त
जिनकी कृश–जंघाओंपर संघर्ष मना ते थे उन्मत्त
जिनकी छाती के गडहोंपर दीप वासना के जलते
जिनके नील कपोलोंपर मतवाले गाहक मुख मलते

'अंचल' यांची ही बैठक असल्यामुळे ते सहजच पुरोगामी मूल्यें आत्मसात् करूं शकले व त्या दृष्टीने त्यांनी मोठी प्रगति केली. त्यांचें काव्यहि बहिर्मुख आणि अधिक पुष्ट होत गेलें.

'मधूलिका' व 'अपराजिता' या काव्यांनंतर 'किरणबेला', 'करील' व 'लालचूनर'—इत्यादि काव्यसंग्रहांतून त्यांचें काव्य विकासतच गेलें. त्यांतून त्यांचा जीवनवादी दृष्टिकोन प्रकट झाला असून दलितवर्गांचीं चित्रें अत्यंत परिणामकारक रीतीने त्यांनी रंगविलीं आहेत. नारीबद्दलचे त्यांचे हे कठोर परंतु सत्य उद्गार पाहा—

माता बनी दूध भर आया, किन्तु न भरता पापी पेट
जननी बनकर भी पशुओंके आगे नग्न सकेगी लेट!!

'अंचल' यांच्यांत झालेला बदल समग्र भारतीय जीवनांतील बदल होता. निवळ व्यक्तिवासनात्मक गीतें, तृष्णा, अतृप्ति या गोष्टी राष्ट्रीय जीवनांत महत्त्वपूर्ण नव्हत्या; किंबहुना, त्यांचें महत्त्व तूर्त कमी झालें होतें. या सर्व प्रकारच्या भावना एका निराळ्याच जीवनतत्त्वाच्या भट्टींत (Life principle) रूपपरिणिति पावत होत्या. 'अंचल' सारखा विद्रोही कवि यापासून निराळा राहणें अशक्य होतें. क्रांतीशिवाय खरें स्वातंत्र्य नाही, असा विश्वास 'अंचल' यांनी आपल्या काव्यांतून प्रकट करून त्या क्रांतीबद्दलचीं गीतें तन्मयतेने गाईलीं. जगाकडे व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जागतिक संघर्षाकडे पाहाण्याचा जो एक बौद्धिक दृष्टिकोन हवा ... ल' यांजजवळ असून 'समाज और साहित्य' हा एक विचारप्रवर्तक पुरो..... लिहिला आहे. 'किरणबेला' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत पूर्वीच्या स्वतःच्याच 'Romantic' काव्याबद्दल 'अंचल' यांनी पुढील उद्‌गार काढले आहेत—

'आज कवि को रोमांसवाद, यथार्थवाद, या व्यक्तिवाद का परिधिको त्यागकर जीवन और संघर्ष के बोझसे टूटे, युद्धसे निचुडे और चुसे, अंधविश्वासी, पराजित और निराश मानवकी अंतिम विजय के गीत गाने है. हां, इतना सत्य है कि, उसे गाना है, और जनता को मृत्युसे होकर जीवित रहने और यथार्थ जीवनका परम विजयका उदय-उच्चार निनादित करना है। मैने कुछ ऐसा ही करने की चेष्टा की है। जहां मै बहक गया हूं, वहां मेरी दुर्बलता है। जीवन के क्षयी रोमांसके प्रति अवांछनीय आशा की है, जहां कहीं मै ऐसा करने मे सफल हो पाया हूं वहीं मैने अपने को पाया है ... '

ज्या प्रेयसीला सुरवातीच्या काव्यांत 'अंचल' यांनी आळविलें, तिलाच पुढील काव्यांत मोठ्या उपरोधिक शब्दांत ते निजायला सांगत आहेत—

आओ प्रेयसि, सो जाओ तो, तुम हो इन महलोंकी रानी
परनाली के गंदे कुत्ते ये टुकडोंके व्रती भिखारी
इनकी चीख पुकार युगोंसे ऐसी ही दहशत फैलाती
इन अंधे पशुओंसे बदतर जीवों को क्यों मौत न आती ?
क्यों इनके दुख की चिंतासे जाग रही हो तुम सुकुमारी
मिट्टीमे मिलने दो इनको पाप इसीके ये अविचारी !!

'करील' व 'लालचूनर' या कवितासंग्रहांतून दलित वर्गाची यशस्वी चित्रें 'अंचल' यांनी रेखाटलीं आहेत. आधुनिक हिन्दीच्या कवींत 'अंचल' हे लोकप्रिय कवींपैकी एक आहेत, हें निःसंशय ! त्यांच्या काव्यांत युगजीवनाचें प्रतिबिंब आहे.

अर्थात् 'अंचल' हे वाट चालत आहेत व तिर्यातच आहेत. 'क्रांती' विषयीं वाटणारें बौद्धिक आकर्षण व दुरून पाहिलेल्या दलित-जीवनाविषयीं वाटणारा कळवळा त्यांच्या कवितेंतून असला, तरी जन-जीवनाशी खरा खरा संपर्क त्यांना अजून स्थापित करावयाचा आहे व हा जीवनवादी दृष्टिकोन त्यांच्या मनःपिंडांत एकजीव व्हावयाचा आहे. अतृप्ति, विकृत सौंदर्यासक्ती त्यांच्या काव्यांतून पूर्णतः नष्ट झालेली आहे, असें नव्हे; किंवा, त्यांचीं पुरोगामी रेखाचित्रें पूर्ण वास्तव आहत, असेंहि नव्हे. परंतु जगाकडे पाहावयाचा दृष्टिकोन मात्र अत्यंत पुरोगामी ठेवून स्वतःच्या प्रामाणिक मताप्रमाणें त्या मार्गावर 'अंचल' चालू लागले, हें काम कमी धिटाईचें नाही. त्यांच्या सौंदर्य-चित्रांमुळे सुरवातीस ते अत्यंत लोकप्रिय होते. त्या लोकप्रियतेचीहि पर्वा न करतां आपल्या मताप्रमाणें ते लिहावयास लागले, तेव्हा त्यांच्या लोकप्रियतेस धोका पोचणें शक्य आहे, हें त्यांना माहीत होतें. तरी त्यांनी आपल्या बौद्धिक श्रद्धेवर विश्वास ठेवून लेखन चालू ठेवलें व त्यांची लोकप्रियता वाढलीच, कमी झाली नाही. हीच साहसी वृत्ति त्यांच्या काव्यांत आहे व कादंबऱ्यांतहि आहे; व हिच्यांतच त्यांच्या लोकप्रियतेचें बीज आहे.

• • •

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथाकाव्य

प्रा. भवानीशंकर श्री. पंडित, एम्. ए.

● नागपूरचे प्रसिद्ध साहित्यिक प्रा. भ. श्री. पंडित यांनी 'कथाकाव्या'ची सर्वांगीण चर्चा या लेखांत केली आहे.

• • •

कथाकाव्य हा नाट्यकाव्याप्रमाणें वस्तुनिष्ठ (objective) अथवा अव्यक्तिगत (impersonal) काव्यप्रकार आहे. या प्रकारच्या काव्यांत कवि हा त्रयस्थाची भूमिका पत्करत असतो. काव्यविषय निवडतांना व त्याचा विचार करतांना तो स्वत: अलिप्त राहतो आणि मग जीवनाकडे पाहतो. त्यामुळे या प्रकारच्या काव्यांत त्याचें व्यक्तित्व सरमिसळण्याचा संभव फार कमी असतो. 'फार कमी' असें म्हणण्याचें कारण असें की, बहुतेक सर्व लेखनप्रकारांत लेखकाचें स्पष्ट अथवा अस्पष्ट प्रतिबिंब उमटलेलें असतें. तेव्हा तें तसें या प्रकारांतहि उमटलेलें असतें. परंतु भावकाव्यांतलें व्यक्तित्व व कथाकाव्यांतलें तथाकथित व्यक्तित्व यांत पुष्कळ फरक आहे.

भावकाव्य व कथाकाव्य.

कथाकाव्यांत कवीनें जे विचार व जे विकार प्रदर्शित केले असतील, अथवा जे प्रसंग व जीं पात्रें निर्माण केलीं असतील, त्यांवरून त्याचें अंधुक व्यक्तित्व अस्पष्टपणें व्यक्त होतें. उलट भावकाव्यांत तो 'स्वत:'लाच प्रत्यक्ष प्रकट करीत असतो. किंबहुना, त्याचें व्यक्तित्व हाच भावकाव्याचा विषय असतो. भावकाव्याची उभारणी ही निव्वळ भावनेवर असते, तर कथाकाव्याची रचना ही कथानकाच्या पायावर झालेली असते. कथाकाव्य हें अनात्मपर, तर भावकाव्य हें आत्मपर असतें. कथाकाव्य लिहिणाऱ्या कवीची भूमिका ही सजावट करणाऱ्या शृंगाऱ्याची असते. उलट भावकाव्य प्रसवणाऱ्या कवीची भूमिका ही एकाग्र द्रष्ट्याची असते. भावकाव्यांत नदीचा अप्रतिहत ओघ असतो, तर कथाकाव्यांत कारागिरीची नाजूक कलाकुसर असते. भावकाव्याच्या संग्रहांत एकदा ही भावना, तर एकदा ती भावना, असें भावनांचें वैचित्र्य दिसू शकतें. परंतु कथाकाव्याच्या संग्रहांत निरनिराळ्या कथा असल्या, तरी त्यांच्या एकंदर स्वरूपांत तोचतोपणाचा ठराविक इतिहास असतो. कथाकाव्य हें कलात्मक असल्याने त्याचा संबंध बुद्धीशीं असतो. उलट भावकाव्य हें स्वाभाविक असल्याने त्याचा संबंध हृदयाशीं असतो. भावकाव्य हें बहुधा गेय असतें, त्याचें स्वरूप सामान्यत: लघु असतें आणि एका बैठकींत तें ऐकतां येतें. याउलट कथाकाव्य हें अगेय असतें, त्याचें स्वरूप बहुतेक दीर्घ असतें आणि तें वाचण्यास एकाहून अधिक बैठकी लागण्याचा संभव असतो. महाकवींच्या कृतींत या दोन्ही प्रकारांचा संकर आढळतो.

नाट्यकाव्य व कथाकाव्य.

हे दोन्ही प्रकार वस्तुनिष्ठ अथवा अव्यक्तिगत असल्यामुळे त्यांच्यांत कांहीं बाबतींत साम्य तर कांहीं बाबतींत विरोध आढळतो. या दोन्ही काव्यप्रकारांत संविधानक, प्रसंग, पात्रें, त्यांना

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कृति, संवाद आणि निर्मात्याची विचारप्रणालि व लेखनशैलि या गोष्टी सारख्या असल्या, तरी त्यांच्या योजनेंत कमालीचा निराळेपणा असतो. नाट्यकाव्याचें संविधानक हें बांधेसूद असतें. त्यांत यत्किंचित् फिरवाफिरव करतां येत नाही. पण कथाकाव्याचें कथानक हें बरेंच सोयीस्कर व सैल असतें. त्यांत मनाप्रमाणें कमीअधिक फेरबदल करतां येणें शक्य असतें. कथाकाव्याच्या कथानकांत गुंतागुंत असली तरी चालते. पण नाट्यकाव्याच्या कथानकाची गुंफण ही आरंभ, उत्कर्ष, कळस, उतार व शेवट या पायरीपायरींनी व हळुवार हातांनी करावी लागते. नाट्यकाव्याचा प्रयोग हा रंगभूमीवर व्हावा अशी इच्छा असल्यास संविधानकाचा काल, पात्रांच्या कृति व त्यांच्या संचाराची स्थळें यांत अबाधित अद्वैत राखावें लागतें. परंतु कथाकाव्यांत एखाद्या व्यक्तीचें जन्मापासून तों मृत्यूपर्यंतचें सर्व चरित्र चित्रित करतां येतें. कथाकाव्याला स्थळ, काल व पात्रांच्या कृति यांची बंधनें नाहीत. मात्र कथानक हें पौराणिक अगर ऐतिहासिक असेल, तर त्यांत स्थलविपर्यास वा कालविपर्यास होऊं नये, याविषयीं या दोन्ही काव्यप्रकारांनी सावध असणें आवश्यक आहे.

नाट्यकाव्य रचणारा कवि हा स्वतःस अलिप्त ठेवून पात्रांच्या चित्तांत प्रवेश करतो व त्यांच्या मूकभावनांना तोंड फोडतो. परंतु तो स्वतः खरोखर अलिप्त राहतो किंवा नाही, याबद्दल मात्र नक्की असा पुरावा देतां येत नाही. उलट कथाकाव्य लिहिणारा कवि हा मात्र खरोखर तिऱ्हाईत या नात्याने पात्रांसंबंधीं माहिती देत असतो, हें कोणाच्याहि सहज लक्षांत येण्यासारखें आहे. क्वचित् ती माहिती देत असतांना तो तीं पात्रेंच वाचकांपुढे आणतो आणि प्रत्यक्ष त्यांनाच माहिती पुरवण्यास सांगतो, आणि क्वचित् त्यांचा गुप्त पत्रव्यवहारहि समोर उघडा ठेवतो. त्यांचे वेष, त्यांची चालचलणूक, त्यांचे हातवारे, त्यांचे नेत्रसंकेत—यांचीं रंगतदार वर्णनें करण्यांत तो स्वतःला धन्य मानतो. परंतु नाट्यकाव्य रचणाऱ्या कवीला मात्र पात्रांची वेषभूषा, त्यांची हालचाल अथवा त्यांचे हावभाव यांचा निर्देश करण्याची सोय नसते. पात्रांचा स्वभाव प्रकट करावयाचा झाला, तर भिन्न भिन्न पात्रांच्या तोंडीं त्याला त्यांसंबंधीचे संवाद घालावे लागतात अथवा 'स्वगत' भाषणाचा आसरा घ्यावा लागतो. किंवा, नाट्यकाव्याचा प्रयोग झाला, तर नटांच्या अभिनयामुळे पात्रांच्या स्वभावावर प्रकाश पडतो. तेव्हा नाट्यकाव्य लिहिणाऱ्या कवीला पुष्कळ प्रमाणांत रसिकांच्या सहृदयतेवर हवाला ठेवावा लागतो, यांत कांही शंका नाही. प्रेक्षक सुबुद्ध असले, तरच नाट्यकाव्यानें चीज होतें. कथाकाव्याचे वाचक निर्बुद्ध असले तरी चालतें. कारण कथाकवि हा कथाकाव्यांत पात्रांच्या स्वभावांचीं तपशीलवार विश्लेषणें करून वाचकाला प्रत्येक बाब पटवून देऊं शकतो.

नाट्यकाव्यांत वर्णनास अगदी वाव नसतो. एकाद्या पात्राच्या तोंडीं तें घातल्यास कृत्रिमतेचा दोष उद्भवण्याचा संभव असतो. तेव्हां रंगभूमीवर त्याचा प्रयोग करतांना वर्णनांची ही उणीव चितारलेल्या देखाव्यांनी भरून काढावी लागते. कथाकाव्यांत कवि हा समर्पक शब्दांच्या रंगांनी वर्णनांचा चित्रपट रेखाटूं शकतो. नाट्यकाव्यांत संवाद हे स्वाभाविक, सुटसुटीत, सुंदर व सूचक हवेत. कथाकाव्यांत ते लांबले, तरी चालण्याजोगें असतें.

नाट्यकाव्यांतली मध्यवर्ती कल्पना ही रहस्यमय असल्यास प्रेक्षकाची उत्कंठा जागृत राहते व त्याच्या कल्पनेस विस्मयाचा गोड धक्का बसतो. नाट्यकाव्य आकर्षक करण्याचें हें एक प्रभावी साधन आहे. कथाकाव्याची वेधकता ही चटकदार कथनशैलीवर अवलंबून आहे. या दोन्ही काव्यप्रकारांत करुण व हास्य हे दोन रस एकसारखे अगर आळीपाळीने खेळते ठेवणें अतिशय आवश्यक आहे. अवांतर रस हे विशिष्ट वयांतच आस्वाद्य असतात. परंतु या दोन रसांची

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मौज बालापासून तों वृद्धापर्यंत कुणीहि लुटूं शकतें. या दोन्ही काव्यप्रकारांतील प्रसंगांना अनुकूल अथवा प्रतिकूल उठाव देण्यासाठी निसर्गाचें तात्पुरतें साह्य घेतां येऊं शकतें. मात्र नाट्य-काव्याच्या प्रयोगांत चितारलेले देखावे लागतील, तर कथाकाव्यांत कवि ते शब्दांच्या द्वारें उभे करील; विनायकांनी 'गणिकोद्धारा'च्या आरंभीं आणि चंद्रशेखर व '.श्री' यांनी 'काय हो ! चमत्कार'' व 'कमळा' यांच्या अंतीं' त्याचा तसा उपयोग करून घेतला आहे.

नाट्यकाव्याचें बाह्यरूप हें सदैव आटोपसर असतें. कारण त्याच्या प्रयोगास काळाची मर्यादा असते. आपल्याकडे अजून नाट्यकाव्याचे प्रयोग दिसत नाहीत. कारण आपल्या वाङ्मयांत नाट्यगीतें निर्माण झालीं आहेत; परंतु नाट्यकाव्यांचा मात्र अभाव आहे. इंग्रजी वाङ्मयांत शेक्सपिअरच्या कृति या नाट्यकाव्य या संज्ञेने ओळखल्या जातात. त्या ज्या तऱ्हेच्या छंदांत (Blank verse) लिहिण्यांत आल्या आहेत, त्या तऱ्हेचा प्रभावी छंद अजून आपल्याकडे निर्माण झालेला नाही. सावरकर, आ. रा. आणि वा. ना. देशपांडे वकील इत्यादिकांनी त्या दिशेने प्रयत्न केले आहेत. परंतु शेक्सपिअर किंवा मिल्टन यांची त्या प्रकारची रचना वाचतांना कानांला नादामुळे व मनाला अर्थामुळे जो आनंद अनुभवण्यास सापडतो, तो या मराठी प्रयत्नांत लाभत नाही; असें मोठ्या खेदाने नमूद करावें लागत आहे. मराठी भाषेच्या प्रकृतीचा विचार करून या इंग्रजी छंदाला जवळ असा एखादा छंद निर्माण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कथाकाव्याच्या वाचनास काळाची मर्यादा नसल्यामुळे त्याचें बाह्यरूप जाडजूड असूं शकतें. हे दोन्ही काव्यप्रकार हाताळणाऱ्या कवींचा आपआपल्या माध्यमावर विश्वास हवा. म्हणजे हे दोन्ही काव्यप्रकार यशस्वी होऊं शकतात.

कथा-कादंबरी व कथाकाव्य.

नाट्यकाव्याचें गद्य नाटकाशीं आणि कथाकाव्याचें गद्य कथेशीं व कादंबरीशीं निकटचें नातें आहे, हें येथे निराळ्याने सांगण्याचें कारण नाही. परंतु हें नातें असून देखील कथाकाव्य आणि कथा व कादंबरी यांच्यांत महत्त्वाचा फरक आहे, हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

कथा-कादंबरी व कथाकाव्य यांच्यांत केवळ कथानकाच्या बाबतींत साम्य आहे. परंतु कथाकाव्यांत कवि हा वाचकाशीं प्रत्यक्ष बोलत असल्याचा जसा भास होतो, तसा तो कथा-कादंबरींत होत नाही. त्यांत तो अप्रत्यक्षरीतीने बोलत असतो. तेव्हा साहजिकच प्रत्यक्ष बोलण्या-मुळे वाचकाच्या मनांवर जसा कथाकाव्याचा परिणाम होतो, तसा तो कथा-कादंबरीचा होत नाही. कथा-कादंबरींत तपशीलाला महत्त्व असतें आणि जये तेथे तत्त्वांची व मूलभूत सिद्धांतांची चर्चा चाललेली असते. परंतु कथाकाव्यांत तपशील नसतो की, तत्त्वांची व मूलभूत सिद्धांतांची रुक्ष चर्चा नसते. त्यांत त्यांचा केवळ काव्यमय विस्तार असतो.

कथा व कादंबरी गद्यांत असल्यामुळे वाचकाला अथवा श्रोत्याला रेंगाळणाऱ्या 'रें रें गाडींत ताटकळत बसल्यासारखें वाटतें, उलट कथाकाव्य हें पद्यांत असल्यामुळे वाचक अथवा श्रोता त्याच्या त्वरित तें बरोबर धावूं लागतो आणि त्याचा हुरूप कायम राहतो. कथा कादंबरींत निव्वळ वर्णन असतें. तें करतांना लेखक हा शब्दांच्या बाबतींत फारसा चोखंदळ नसतो. परंतु कथाकाव्यांत कवि हा कल्पनेची मूर्ति (image) घडवत असतो. त्यामुळे त्यास शब्दांची निवड करतांना विशेष जागरूक राहावें लागते.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथाकाव्याचे विशेष

मनुष्याच्या रक्तांत कथेची आवड आहे. तीन वर्षांच्या लहान नातवंडापासून तो साठी उलटलेल्या म्हाताऱ्या आजीबाईपर्यंत सर्वांना कथा ऐकण्याची उत्सुकता असते. नाटक पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर जी जिज्ञासा, जी उत्कंठा, जें कौतुक आणि जें प्रश्नांकित भाव असतात, अगदी तेच भाव कथाकाव्य ऐकणाऱ्या श्रोत्याच्या मुखमंडलावर कमी अधिक प्रमाणांत मुद्रांकित झालेले दिसतात. शिवाय कथाकाव्यांत कादंबरींच्या प्रत्यक्ष परिणामाचें सामर्थ्य असतें तें निराळेंच. मनोरंजनाबरोबर उद्बोधन करून ज्याला समाजाचें हित साधावयाचें असेल, त्याला कथेसारखें दुसरें अमोघ माध्यम नाही. आपल्या उपनिषदांत, बौद्धांच्या जातकांत, जैनांच्या धर्मग्रंथांत व खिस्त्यांच्या बायबलांत किती तरी नीतितत्त्वें कथांच्याद्वारें पुढे मांडली आहेत. कोणत्याहि राष्ट्रांतलें जुन्यांतलें जुनें वाङ्मय घ्या, तें कथेच्या स्वरूपांत असलेलें आढळेल.

कथा मुद्दाम सांगूं म्हटल्याने सांगता येत नाही. उलट कांही पूर्वतयारी नसतांना ती एकाएकी एकदम सांगता येते. अशा सहज कथनांत स्वाभाविक उद्गार असतात आणि कथा-विषयहि आपोआप सुचलेला असतो.

कथाकाव्याची व्याख्या करावयाची झाल्यास ती 'प्रदीर्घ प्रवाही पद्य' अशी करतां येईल. मात्र त्या पद्यांत मानवी स्वभावाचीं तर्वें पाहिजेत. मानवाची बाहेरली हालचाल व आंतली चलबिचल यांच्या मिलाफाचें शब्दचित्र म्हणजे कथाकाव्य असें थोडक्यांत म्हणतां येईल.

कथाकवीची प्रतिभा ही वैणिक अथवा नाट्यात्मक असलीच पाहिजे, असें नाही. कारण कथा-काव्य हें वैणिकाप्रमाणें ऐका अथवा नाटकाप्रमाणें बघा, असा आग्रह धरण्याचें प्रयोजन नसते. मुद्रणकला अस्तित्वांत नव्हती, तेव्हा पुष्कळांना कथा-काव्य ऐकावें लागत असे. पण आता तें मुद्रित होत असल्यामुळे विराम चिन्हांच्या साह्याने वाचतां येण्याची सोय झाली आहे.

कथाकाव्याचें कथानक हें स्वतंत्र असलेंच पाहिजे, असें नाही. एकादा प्रतिमावंत कवि हा कथानक जुनेंच घेतो, पण त्यांत नवे रंग भरून दाखवतो. तो नवीन कल्पनासृष्टि निर्माण करतो, म्हणून ती वास्तव सृष्टी पेक्षा निराळी असते, असें मात्र नाही. ती होतां होईल तों मानवी जीव-नाशीं सुसंबध्द व त्याच्या दैनिक जीवनक्रमास जवळची असते. कथाकवि हा आपल्या वाचका-कडून त्यांच्या आवाक्याबाहेरच्या अपेक्षा करीत नाही. त्याच्या कथाकाव्यांत तेच जुने सिद्धांत व त्याच जुन्या मर्यादा असतात. परंतु त्यांचें प्रदर्शन करण्याची त्याची पद्धति नवीन व चित्ता-कर्षक असते.

कथानक पुरातन असल्यास त्यांतलीं पात्रें वाचकांच्या पूर्व परिचयाचीं असतात. मात्र कथाकाव्यांत त्यांचें व्यक्तिदर्शन हें रेखाचित्राप्रमाणें थोडक्यांच, पण स्पष्ट असतें. त्यांत त्यांच्या हाव-भावांचें वर्णन करावयाचें झाल्यास तेंहि चुटकी सरसें आटोपतें घ्यावें लागते. त्यांना उठाव मिळावा म्हणून वातावरणाची पार्श्वभूमि निर्माण करावी लागते तीहि मोजक्या व वेचक शब्दांच्या दोन चार फटकाऱ्यांत तयार व्हावी, अशी अपेक्षा असते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथाकवि हा प्रतिभासंपन्न असल्यास त्याच्या लेखणींत सामान्य नायकास असामान्य नायक बनविण्याची आणि साध्या प्रसंगास सुंदर स्वरूप देण्याची अद्‌भुत किमया असते. आपल्या प्रतिभेच्या बळावर तो कथेच्या ओघांत रोमहर्षक घटना घडवत असतो आणि त्यांना अनुरूप असे भव्य देखावे रंगवत असतो.

कथाकविच्या कल्पनांत चढ एकदम नसावा. त्याने वाचकाच्या आकलनशक्ती–बरोबर तो हळू हळू वाढवावा; आणि शेवटीं अनपेक्षित कलाटणी देऊन अथवा हृदयांत खळबळ करील असा एकादा प्रसंग उत्पन्न करून तिच्यावर कायमचा असर करावा.

वाचकाच्या मनांतील प्रेम, पराक्रम, खेद, आनंद आदि सुप्तभाव जागृत केल्यास तो कथेशीं तत्काळ समरस होतो. तिच्यांत त्याला आपल्या अनुभवाच्या छटा दिसूं लागतात. संकटांमधून विजयाची वाट कशी काढावी, अथवा निराशेच्या अंधारांतून आशेच्या प्रकाशांत कसें जावें, या गोष्टी तो कथाकाव्यापासून शिकतो व संसारांत स्वतःला सावरतो. कथाकाव्य त्याच्या वृत्तींना उल्हसित करीत असतें.

कथाकवीच्या वाणींत प्रवाह हवा. त्याची भाषाहि प्रसादमय हवी. ती जर किचकट असेल, तर काव्याची अर्धी-अधिक मौज नष्ट होईल. त्याचे शब्द रोजच्या प्रचारांतले पाहिजेत त्याने योजलेल्या म्हणी व वापरलेले वाक्प्रचार यांत थोडक्यात पुष्कळ अर्थ व्यक्त करण्याचें सामर्थ्य हवें त्यानें केलेल्या कल्पना व घडवलेले अलंकार हे सहज लक्ष्यांत यावेत.

कथाकाव्यांतील संवाद हे सुटसुटीत व सूचक असावेत. ते ऐकतांना पात्रें हीं एकाद्या 'फोनो' प्रमाणें बोलत आहेत, कसें वाटूं नये. कथाकाव्यांतील वर्णनांत फाजील तपशील नसावा. वर्णन म्हणजे 'सूचि' नाही की, 'पोलिस रिपोर्ट' नाही. आवश्यक तेवढ्याच भागाचें देखलेलें वर्णन असलें की, कथाकाव्य वेधक होतें. तपशील हा बेचव, नीरस व कंटाळवाणा असतो. तेव्हा कथाकवीने गोष्टी–वेल्हाळपणा सोडला पाहिजे व पाल्हाळ टाळला पाहिजे. 'दि लेडी ऑफ् दी लेक' या स्कॉटच्या काव्याचें परीक्षण करतांना हॅझलिट्‌ने पुढील मार्मिक उद्‌गार काढले आहेत;—" A mere narrative and descriptive poet, garrulous of the old time. " ते याबाबतींत मननीय आहेत.

कथाकाव्याचें खरें यश हें कवीच्या कथन शैलीवर निर्भर आहे. कवीच्या कथनशैलींत जर चटका असेल, तर कथावाचकाच्या मनाचा ताबा तावडतोब घेते. याबाबतीं जॉर्ज ब्रॅब या सुप्रसिद्ध कथाकविचे विचार चिंतनीय आहेत. तो म्हणतो;—" In whatever degree I may venture to differ from any others in my notions of the qualifications and character of the true poet, I most cordially assent to their opinions who assert, that his principal exertions must be made to engage the attention of his readers;............in truth, I can but consider this pleasant effect upon the mind of a reader as depending neither upon the events related (whether they be actual imaginary), nor upon the characters introduced (whether taken from life or fancy), but upon the manner in which the poem it self is conducted; let that be judiciously managed,........."

वाचकाला रोजच्या जीवनाचा, त्यांतील त्याच त्या घडामोडींचा आणि सतत होणाऱ्या मनोभंगाचा वीट आलेला असतो. यासाठीं कथाकवीने त्याच्यासमोर अशीं कल्पनाचित्रें उभीं करावींत कीं, त्यांत त्याला सत्याचा आभास होऊन स्वारस्य तर वाटावें व समाधान तर मिळावें; परंतु हीं चित्रें प्रत्यक्ष आपल्या आयुष्यांतील नाहींत या कल्पनेने आनंद व्हावा. हीं चित्रें दाखवतांना कवीने वाचकाच्या मनाची पातळी उंचावण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे.

कथा काव्याकरितां जीं पद्यें योजावयाचीं, तीं धावती व पल्लेदार असलीं पाहिजेत त्यांच्या ठिकाणीं लहानांतला लहान व मोठ्यांतला मोठा विचार सामावून घेण्याची शक्ति असली पाहिजे. शिवाय तीं गद्याला जेवढीं जवळ असतील, तेवढें चांगलें. कारण तीं ऐकतां ऐकतांच अर्थाचा बोध झाला पाहिजे. आपल्याकडे मुक्तेश्वर, श्रीधर व महीपति यांनी कथा सांगण्यासाठीं ओवीचा उपयोग केला होता. पुढें पेशवाईंत 'कीर्तन' ही संस्था फार लोकप्रियता पावली, तेव्हा मोरोपंतांनी तालासुरावर म्हणतां येणाऱ्या 'आर्ये' चा प्रसार केला. अमृतरायाचे कटावहि गद्याला जवळ आहेत. परंतु त्यांना धरबंध नसल्यामुळे पुढे कुणी त्यांचा अवलंब केला नाही. थोरल्या चिपळुणकरांच्या 'मेघदूता' मुळें जुनी साकी नव्या जोमाने प्रसार पावली. जुन्या जमान्यांत तिच्या सुरवातीस अगर अखेरीस दोन अर्ध्या चरणांचें एक पालुपद असे. चिपळूणकरांनी तें छाटून टाकलें व तिचा ओघ अनिरुद्ध केला. झुंजारराव नाटकांतलें 'चंद्रकांत राजाची कन्या' हें पद रंगभूमिवरील प्रयोगामुळें सर्वतोमुखीं झालें होतें. त्या संधीचा आयता लाभ घेऊन कित्येक कवींनी त्या चालीचा आपल्या कथाकाव्यासाठीं उपयोग केला. अगदी अलीकडे सावरकरांनी अनुष्टुभाची योजना करून कथाकाव्य हें कसें सुंदर करतां येतें, तें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. आनंदतनय वामनादि कवींनी हाताळलेलीं अक्षर गण वृत्तें आधुनिक कवींनीं कथा काव्यासाठीं वापरलीं नाहींत. याचें कारण म्हणजे विचार व्यक्त करण्याच्या दृष्टीने तीं गैरसोयीचीं व रचनेच्या दृष्टीने तीं कठिण होतीं, हें होय. आर्या, साकी व चंद्रकांत हीं पद्यें लवचिक व सोयीची असल्यामुळें पुढील कवींनी त्यांचाच उपयोग विशेष केला.

कथाकाव्याचे प्रकार.

१ पोवाडा, लावणी व लोकगीत.

कथाकाव्याच्या या तीन प्रकारांत काव्यकलेच्या प्राथमिक अवस्थेचें दर्शन होतें. हे काव्यप्रकार बहुधा अलिखित असतात; आणि समाजांत परंपरेने जोपासले जातात. या काव्य प्रकारांचें कर्तृत्व कित्येकदा अज्ञात असतें. परंतु तें बहुतकरून एखाद्या निरक्षराकडे अथवा अशिक्षिताकडे असतें, या विषयीं मात्र शंका नाही. या काव्यप्रकाराची धाटणी साधी व सरळ असतें. भाषेचें वळण बालबोध असतें व कथन धावतें असतें. या काव्यप्रकारांच्या कथांत पात्रांचे मनोभाव व त्यांच्या कृतींचे हेतु यांच्या विश्लेषणास वाव नसतो; आणि सविस्तर वर्णनांना ऐसपैस ठाव नसतो. परंतु त्यांच्या जागा पळत्या प्रसंगांच्या पंगतीने व उडत्या कृतींच्या रांगेने पटकाविलेल्या असतात. या काव्यप्रकारांची रचना शिथिळ असते. पण तींत एकतऱ्हेचें तेजस्वी चैतन्य खेळत असतें. हे काव्यप्रकार हाताळणारे गोंधळी, तमासगीर, भाट, हरबोले इत्यादि गडी ज्यावेळीं आपआपल्या कथा म्हणून दाखवतात, त्यावेळीं संबळ, तुणतुणें, डफ, टिमकी, झांजा आदि वाद्यांची साथ घेतल्याशिवाय राहत नाहींत. या वाद्यांच्या तालासुरांत आणि 'जी जी रे ! जी जी ' व 'राजाहो ! राजाहो ' या त्यांच्या पालुपदांत त्यांच्या पद्यांची सैल रचना लोप पावत असते.

पोवाडा हा काव्यप्रकार पराक्रमाचा निदर्शक आहे. त्यांत एकाद्या वीराची गाथा असतें- पोवाडा रचणारा गोंधळी हा त्यांत आपल्या आदर्श वीराच्या साहसाचें, धाडसाचें, पराक्रमाचें व प्रेमाचें कीर्तिगान गात असतो. त्याची रचना रेखीव नसली, तरी विलक्षण परिणामकारक असते. आपल्याकडे अज्ञातदास, तुळशीदास व यमाजी या तीन शिवकालीन शाहिरांचीं नावें प्रसिद्ध आहेत. परंतु खेदाची गोष्ट अशी की, यांपैकी फक्त पहिल्या दोघांच्याच आणि त्याहि नेमक्या दोनच कृति आज उपलब्ध आहेत. मराठेशाहींतील शाहिरांच्या पोवाड्यांचें संकलन व संपादन शालिग्राम, गुप्ते व य. न. केळकर यांनी केलें आहे.

प्राचीन पोवाड्यांपासून स्फूर्ति घेऊन त्यांच्या पद्धतीवर सावरकर, गोविंद, माधव, अनंततनय, टेकाडे, खाडिलकर, नानिवडेकर, मुचाटे, अमरशेख इत्यादि अर्वाचीन कवींनी पोवाडे रचले आहेत. परंतु प्राचीन पोवाड्यांत व अर्वाचीन पोवाड्यांत महत्त्वाचें अंतर आहे. नवे पोवाडे हे जुन्या पोवाड्यांप्रमाणें ऐतिहासिक आहेत, हें खरें. पण ते साहित्यिक स्वरूपाचे आहेत, हें विशेष आहे. पुन्हा त्यांत व्यापक वर्णनें व सूक्ष्म मनोविश्लेषणें आहेत. त्यांची भाषा कमवलेली व रचना जमवलेली आहे. त्यांत देशभक्तीच्या नवीन कल्पनेचें बीज आहे. तेव्हा ते जुन्या पोवाड्याची नक्कल आहेत, असें म्हणतां येत नाही. उलट ते सर्वथैव स्वतंत्र व मौलिक आहेत.

लावणी हा काव्य प्रकार बहुधा शृंगारिक असतो. त्यांत बहुधा एकाद्या विरहिणीच्या मनोव्यथेची किंवा एकाद्या संयोगितेच्या प्रीतिरतीची कथा असते. क्वचित् तिच्यांत विनोदहि दृष्टीस पडतो. 'एका राजाला कन्या झाली' या होनाजीच्या लावणींत आणि 'दोघी सवती भांडति पति भांगडभुंगा' या [1]कुणाच्याशा लावणींत भरपूर हास्यारस आहे. परंतु कित्येकदां हा रस श्लीलतेच्या सीमा ओलांडून ओसडूं लागतो. घरापासून आठ महिने दूर मुलुखगिरीवर गेलेल्या शिपाईगड्यासाठी पिकवलेल्या त्या विनोदांत क्वचित् कुठे मर्यादेचा भंग झाला असल्यास तो क्षम्य समजणें भाग आहे. शालिग्राम व अधिकारी यांनी जुन्या लावण्यांचें संकलन केल आहे. नव्या लावण्या लिहिणारांत मरहूम पट्टे बापूराव हे आघाडीवर होते.

[1] ही लावणी परशरामाची आहे. —संपादक.

आपल्याकडे दाते, वैंडे, जोशी, चोरघडे, सानेगुरुजी, गोरे, कमलाताई देशपांडे इत्यादिकांनी अनेक लोकगीतें एकत्रित केलीं आहेत. त्यांत कांही कथा आढळतात. परंतु त्यांचें संपादन यथास्थित व व्यवस्थित झालेलें नाही. शिवाय आपल्याकडे ज्या प्रमाणांत लोकगीतें जमविण्याचा प्रयत्न करण्यांत आला, त्याप्रमाणांत पद्यबध्द लोककथा जमविण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला नाही. तरी पण आठवडी बाजारांत ध्रुव व प्रल्हाद यांच्या पौराणिक, निळावती व छेलबटाऊ मोहना यांच्या काल्पनिक आणि उमाजी व तंट्या यांच्या वास्तविक पद्यबद्ध लोक-कथांची छापील पुस्तकें नजरेस पडतात. क्वचित् 'ऐका ऐका व्रत। एकादशी; राजापाशीं होत्या गाईम्हशी' अशा व्रतकथाहि कानीं पडतात. त्या सर्वांचें संकलन व संपादन झालें पाहिजे।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२ वृहत्काव्यें

हीं फार प्राचीनकाळीं निर्माण झालीं आहेत. त्यांचें वृहत्स्वरूप पाहिलें की, तीं एका व्यक्तीची कृति नसावी, असें वाटतें. कांहीं विद्वानांच्यामतें त्यांची वाढ पिढ्यानुपिढ्या झाली असावी. प्रत्येक पिढींत त्यांच्या मूळ भागांत भर पडत गेली असावी, आणि हळू हळू त्यांना आजचें वृहद्स्वरूप प्राप्त झालें असावें. आपलीं रामायण, भारत, व भागवत हीं वृहत्काव्यें प्रसिद्ध आहेत. भारतांतील कथांचें संकलन हें हळू हळू झालें असावें; व्यास हें विशेष-नाम नसून 'पुराणिक' या अर्थी तें सामान्यनामरूढ असावें; धृतराष्ट्र, दुर्योधन, दुःशासन दुःशीला इत्यादि नांवांवरून हा ग्रंथ म्हणजे मूळांत एखादे रूपक असावें हे तर्क आज कांहीं नवे नाहीत. वृहत् काव्यांत एक नायक असतो व एक नायिका असते; आणि त्यांच्या भोवताली अन्य कथांचे जाळें गुंफण्यांत येत असते. या कथांचा कायमचा टवटवीतपणा पाहिला म्हणजे त्यांचा उगम हा स्वेच्छया झाला असावा, असें वाटत. कथाकारांनी त्यांच्याद्वारें समाजास धर्म, नीति, व्यवहार लोकाचार इत्यादिकांचें शिक्षण देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. या कथांत कधी कधी वास्तवतेच्या जोडीने अद्भुताचा सन्निवेश झालेला आढळतो. ही काव्यें प्रचलित भाषांत नसतात, हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे.

३ महाकाव्यें

संकृत साहित्यांत रघुवंश, कुमारसंभव, किरातार्जुनीय, शिशुपाल वध व नैषध हीं पंच महाकाव्यें प्रसिद्ध आहेत. हीं काव्यें कवींच्या अभ्यस्त वृत्तीची व नागरी शैलीची द्योतक आहेत. यांचें स्वरूप कलात्मक आहे. ही लिहिण्यापूर्वी कवींनीं वृहत्काव्यांचें संशोधन व समालोचन केलें असावें; आणि त्यांत जीं जीं स्थळें सुंदर असतील, तीं तीं स्थळें आपल्या कृतींत उतरवण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला असावा, असें दिसतें. पुढें निरनिराळ्या साहित्यशास्त्रकारांनीं महाकाव्याला निश्चित नियमांची जोड देऊन ठराविक ठशाचें करून टाकलें आहे. त्यांत सर्ग व श्लोक यांची संख्या नियत असते, विषयांत विविधता व वर्णनांत विचित्रता असते. पण सर्वथा नवा असा बदल मात्र नसतो. महाकाव्यांत सर्व रसांचा सन्निवेश आणि एकूण एक अलंकारांचा प्रवेश आवश्यक असतो. यांतील नायक व नायिका यांचे स्वभाव ठरून गेल्यासारखे असतात. तथापि या काव्यप्रकारांतील कांहीं भाग रमणीय व प्रसंग संस्मरणीय असतात, या विषयीं वाद नाहीं.

या महाकाव्यांच्या धर्तीवर मराठींत भास्कर, दामोदर व नरेंद्र यांनी, आणि वृहत्काव्यांच्या धर्तीवर मुक्तेश्वर, श्रीधर व मोरोपंत यांनीं आपल्या कृति सजविण्याची पराकाष्ठा केली आहे. या थोर कवींचा संस्कृत साहित्यांतील वृहत्काव्यांशीं व महाकाव्यांशीं दृढ परिचय होता. त्यामुळे त्यांच्या कृति जवळ जवळ मूळाइतक्याच सरसरमणीय उतरल्या आहेत व लोकप्रिय झाल्या आहेत. नवीन कवींत साधुदास व डॉ. श्रीखंडे यांचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत.

४ आख्यानकाव्यें.

मराठी वाङ्मयांत या काव्यांचा एक वेगळा वर्ग आहे. हीं काव्यें बहुधा एकाच प्रसंगावर आधारलेलीं असतात. या काव्यांतला नायक हा पराक्रमी असून नायिका ही रतीसारखी सुंदर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असते; आणि त्या उभयतांचें परस्परांवर प्रेम असतें. या प्रेमाच्या मार्गांत एक कलिपुरुष कांटे पसरत असतो. नायकाशीं त्याचें द्वंद्वयुद्ध होतें. त्यांत तो पराभूत होतो. आणि मग नायिकेचें नायकाशीं मीलन होतें. या मीलनास 'स्वयंवर' असें काव्यमय नांव आहे. या प्रकारच्या काव्यांत पुरुषाचें शौर्य व त्यांचें स्त्रीदाक्षिण्य आणि स्त्रीचें धैर्य व पुरुषाविषयींची एकनिष्ठा यांचें मोठे मनोज्ञ प्रदर्शन असतें. या काव्यांना मधून मधून अद्भुताची झूक दिलेली असतें; आणि नायक व नायिका यांच्या विरहांत त्यांचें मनोरंजन करण्याकरिता नारदासारखें एकादें विदूषकी पात्र रंगवलेलें असतें. त्यामुळें या प्रकारच्या काव्यांत शृंगार, वीर, करुण हास्य व अद्भुत या रसांची पंचगंगा अव्याहत वाहत असते. आपल्या वाङ्मयांत आनंदतनय, सामराज, रघुनाथ पंडित, नागेश व विठ्ठल या कवींनी या प्रकारची स्वयंवर विषयक ललित काव्यें लिहून अतिशय महत्त्वाची भर टाकली आहे.

५ खंडकाव्यें.

इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनानें आपल्याकडे कांहीं काळ अद्भुतरम्य ऐतिहासिक खंडकाव्यें लिहिण्याची प्रथा पडली होती. हीं काव्यें लिहिणाऱ्या कवींच्या समोर स्कॉटच्या 'लेडी ऑफ दी लेक' आणि 'मार्मियन्' या काव्यांचा आदर्श होता. तो ज्याप्रमाणें एखाद्या वीराचीं अचाट कृत्यें आणि सृष्टीची अनुपम शोभा यांचीं हुबेहूब वर्णनें करून आपलीं काव्यें सजवीत असे, त्याप्रमाणें आपल्याकडे प्रधान, कुंटे, कानिटकर, खरे, वनवासी इत्यादिकांनी आपलीं 'दैवसेनी,' 'शिवाजी,' 'कृष्णाकुमारी,' 'यशवंतराय,' 'हम्मीर' आदिकाव्यें नटवलीं आहेत. स्कॉटचीं काव्यें हीं जशीं प्रोत्साहक असत, तशींच आपलीं काव्यें प्रोत्साहक करण्याचा या कवींनी प्रयत्न केला आहे.

स्कॉटच्या ऐतिहासिक युगानंतर इंग्रजी वाङ्मयांत टेनिसनचें सामाजिक युग अवतरलें. त्याच्या 'प्रिन्सेस' ला कीर्तिकरांनी आपल्याकडील 'इंदिरे' चा पेहेराव चढवला आहे. सावरकरांचें 'गोमंतक' गिरीशांचीं 'अभागी कमल' व 'आंबराई,' माधव ज्युलियनचें 'सुधारक', यशवंतांची 'बंदीशाला,' मायदेवांची 'सुधा' आणि पाठकांचा 'शशिमोहन'—हीं काव्यें व्यापक अशा सामाजिक समस्यांवर लिहिलीं आहेत. क्वचित् त्यांत राष्ट्रीयतेचा व मानवतेचा विशाल दृष्टिकोन आहे. त्यांच्या खंडित स्वरूपांमुळे तीं कंटाळवाणी वाटत नाहींत, हें विशेष आहे. शिवाय रुचिपालट म्हणून यांपैकीं कांहीं काव्यांत मधून मधून भावगीतें पेरलीं आहेत. तीं काव्यांचें माधुर्य वाढविण्यास कारण झालीं आहेत. माधव ज्युलियनचीं 'विरहतरंग' व 'तुटलेलें दुवे' आणि यशवंतांचें 'जयमंगला'—हीं काव्यें वस्तुतः भावकाव्यें आहेत. त्यांत अनेक भावकाव्यांना एका माळेंत ओवून कथाकाव्याचें स्वरूप देण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला आहे.

ग्रे, गोल्डस्मिथ व पार्नेल यांच्या खंडकाव्यांची कामत, टिळक व मोडक यांनी रूपांतरें केलीं आहेत. तींहि वाचनीय आहेत.

६ लघुकथाकाव्यें.

कथाकाव्याचा हा प्रकार त्याच्या आटोपसरपणामुळें अधिक आकर्षक वाटतो. मात्र हा काव्यप्रकार हाताळतांना कवीने आपले कथाकौशल्य पूर्णपणें प्रकट केलें पाहिजे. या काव्य-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रकारांत कथानक हें अगदी तोकडें असतें, प्रसंग एखादाच असतो, पात्रें दोन तीनच असतात आणि वर्णनाच्या तपशीलांना मुळींच वाव नसतो. तेव्हां कवीला आपल्या निरुपम कथनपद्धतीनें या प्रकारचें कथाकाव्य चटकदार करावें लागतें. या प्रकारच्या कविता लिहिण्यांत चंद्रशेखरांना उदंड यश प्राप्त झालें होतें. त्यांच्या ठिकाणीं कलात्मक औचित्य व प्रसंगोचित संयम हे दोन गुण वैपुल्याने वसत होते. शिवाय त्यांची निवेदनपद्धति ही चुटपुट लावणारी होती, त्यामुळें 'उघड गुपित,' 'किस्मतपूरचा जमीनदार,' आणि 'कायहो ! चमत्कार' हीं त्यांचीं काव्यें अजरामर झालीं आहेत. विशेषत: शेवटचें काव्य हें तर अर्वाचीन मराठी काव्याचा एक अनर्घ्य अलंकार आहे. टिळकांच्या 'सुशीलेंत जिव्हाळा आहे, पण चटका नाही. विनायक हे राष्ट्रीय कवि म्हणून प्रसिद्ध होते. पण 'वीरमती,' 'भ्रासतो भास' व 'गणिकोद्धार' या त्यांच्या कथाकाव्यांत त्यांच्यातल्या थोर कलाकाराचें दर्शन होतें. बींची 'कमळा' ही कलेच्या कसोटीवर शंभर टक्के टिकणारी आहे. परंतु तिच्या भाषेंत बोजड संधिसमास व अनोळखी जुने शब्द यांची गर्दी असल्यामुळे तिची हृदयंगमता थोडीफार ढळ पावली आहे, हें कबूल केलें पाहिजे. भिडेद्वय मुजूमदार, व इंदुकांत यांच्या कथाकाव्यांना भाषेचें हेंच कठिणपण मारक झालें आहे. यच्चयावत् मुलांचीं मनें मोहून टाकणारा तांब्यांचा 'पुंगीवाला' हा इतका हुबेहुब उतरला आहे की, तो मूळचा इंग्रजी आहे हें सांगूनसुद्धा त्यावर भरंवसा बसत नाहीं. गोविंदाग्रजांचें 'कृष्णाकाठीं कुंडल' हें काव्य अपूर्ण आहे. परंतु या स्थितींतहि त्यांतील जादू कायम टिकणारी आहे आणि गोडी कधीहि न विटणारी आहे. सावरकरांचें 'कमला' काव्य म्हणजे अमृताचा चषक आहे. रेंदाळकरांनी निर्माण केलेली 'जाधवरावांची मंजुळा' ही सौम्य आहे. तिच्या मानाने माधवांनी निर्माण केलेल्या 'मान्यांची मोहना' व 'मस्तानी' या खरोखरच मस्त आहेत.

गिरीशांचीं 'दोन पातकी' व 'अंधारांतील बाण' हीं दोन्हीं काव्यें विस्तारांत लहान असलीं तरी परिणाम करण्यांत महान आहेत. वा. ना. देशपांड्यांना काव्याचा हा प्रकार जसा साधतो, तसे इतर प्रकार साधत नाहीत. त्यांची 'भारती' कल्पनांच्या दृष्टीने भव्य आहे, 'सोहागरात' अंत:करणास आच लावणारी आहे, 'देवानांपिय:' व 'तरलेले वेद' या करुण कविता शांत रसाचा आस्वाद चाखावयास लावणाऱ्या आहेत. ख्रिस्तदेव हे एका पतित अभागिनीचा उद्धार करतात या कथेवर आधारलेली त्यांची एक कविता अशीच करुणेने ओतप्रोत आहे. तिचा शेवट असाच शांतरसांत झाला आहे. कोलत्यांनी सुंदर अशा ज्या दोन कविता लिहिल्या आहेत, त्यांपैकी 'आटपाट नगरांत' ही एक कविता या काव्यप्रकारांत मोडेल. ही कविता बालरसिकांसाठी रचली असली, तरी ती ऐकतांना प्रौढ रसिकांनीहि नागाप्रमाणें डोलत राहावें, अशी गुंगी तिच्यांत आहे.

कथाकाव्याचें हें वर्गीकरण काटेकोरपणाने केलेलें नाही. भावकाव्य व नाट्यकाव्य या काव्यप्रकारांना इंग्रजी राजवटीपूर्वी आपल्याकडे स्वतंत्र असें अस्तित्व नव्हतें. परंतु कथाकाव्य हा काव्यप्रकार मात्र पूर्वीपासून अस्तित्वांत होता. गद्याच्या आजच्या युगांत कथा व कादंबरी यांच्या अनिर्बंध व स्वच्छंद वाढीमुळे त्याला पायबंद बसला आहे. त्यांत बदलत्या युगमानाप्रमाणें वैशिष्ट्य उत्पन्न करून त्याला लोकप्रिय करण्याची जबाबदारी नवीन कवींवर आहे.

• • •

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकाकिनी

चालली ही कोण एकाकिनी ?
थबके पाउल, घेते चाहुल,
पाही कुणा वाकुनि ? १

धनांधार हेलावित हिसाळित
जागजागिं पथदीप पाजळित
पुनवेचा जणु महाल शोधित
निघाली काय स्वयें यामिनी ? २

घराघरांतिल कणकण वेचित
लोकहितैषी अजर अमर पथ
मानवता वैसला जागवित
रात ही कल्पांत का मानुनी ? ३

चित्रमंदिरीं चित्रमालिका
तुटल्या मिटतां प्रकाशरेखा,
चित्र त्यांतलें एक असे का
झळाळे नील–प्रकाशांतुनी ? ४

विटंबिली वा सत्तांधांनी
ग्रामदेवता जाते उठुनी ?
'येतिल तारक आग होउनी'
सांगती छाया पादिं लागुनि ! ५

घरें पलिकडे कामकन्यांर्ची
नग्न जिथे भरनिशा नशेची,
विहिर निदानीं माय जियेची—
हताशा ही तेथली का कुणी ? ६

की घडुल्यांतील कुणी 'घरेली'
शेज निघे उन्रवाया कुठली
जीवनार्थ, चोरीत साउली
व्यथांना सजवुनि—शृंगारुनी ! ७

घुमती टोले ठाण्यावरुनी,
गस्त दूरची पडते कानीं
श्वान भुंकतें कुठे आळितुनि,
कापते मध्यरात्र त्यांतुनि ! ८

अमृताक्षरें उजवित कविते !—
उजळ जिथे तप तेजहि ढळतें,
आशिव जगांतिल हो निवारते
होउनी सजणी कधी संगिनी ! ९

— बी. रघुनाथ

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हिंदी कादंबरी

सौ. लीला दुबे, एम्. ए.

● नागपूरच्या सौ. लीला दुबे यांनी या लेखांत हिंदी कादंबरीचा मार्मिक आढावा घेतला आहे.

* * *

कथांबद्दलची आवड व आकर्षण भारतवर्षाला कांही नवीन नाही. मानवी मनाची गुंतागुंत व त्याचे निरनिराळे पैलू पाहण्याची जी इच्छा कथासाहित्याच्या मुळाशी असते, ती ऋग्वेदकालापासून आपल्याला दिसेल. ब्राह्मण वाङ्मयांत देखील कांही कथा आढळतात. संस्कृत-मधील वीररसात्मक व उपदेशात्मक कथा, कथासरित्सागर, बृहद्कथा, हितोपदेश वगैरे हिंदीमध्ये अजूनहि प्रचलित आहेत. रामायण व महाभारत जरी काव्यें असलीं, तरी त्यांत देखील कथा-साहित्याकरिता भरपूर प्रेरणा आहे. 'दशकुमारचरित,' 'वासवदत्ता' व 'कादंबरी' या संस्कृत गद्यकथा प्रसिद्धच आहेत. पालीप्राकृतमधील जातककथांचा देखील हिंदी कथासाहित्यावर परिणाम होणें साहजिक होतें. म्हणून भारतवर्षांत कथासाहित्याबद्दलची रुचि फार प्राचीन आहे व याची प्रेरणा मूलत: व संपूर्णत: विदेशी नाही, असें म्हणायला कांही हरकत नाही. त्याचबरोबर निरपेक्षबुद्धीने विचार करून हेंहि लक्षांत ठेवायला हवें की, कादंबरीवजा कथांचा पहिला काळ गेल्यानंतर हिंदी कथासाहित्यांत प्रत्यक्ष इंग्रजी कादंबरीचा व त्याहूनहि जास्त बंगालींतून आलेल्या इंग्रजी कादंबरीतंत्राचा परिणाम स्पष्ट दृष्टिगोचर होऊं लागला. आधुनिक हिंदी साहित्यांत 'उपन्यास' नांव बंगालीतून आलें व कादंबरीचा इंग्रजी साचा देखील तेथूनच आला. या नव्या तंत्राचा आधार घेऊनच हिंदी कादंबरी साहित्याने इतकी प्रगति केली आहे.

सैय्यद इन्शा अल्ला खां यांचे 'रानी केतकी की कहानी' हें हिंदीतील सर्वप्रथम मौलिक कादंबरीवजा पुस्तक होय. बहुधा १८०० ते १८०८ या काळांत तें लिहिलें गेलें असावें. वाङ्मयाच्या दृष्टीने नाही, परंतु पहिलें म्हणून हें पुस्तक नि:संशय महत्त्वाचें आहे. श्रीनिवास दास यांनी प्रेमकथांची चाकोरी सोडून प्रणयाच्या बाहेरहि जग आहे व तें कथांचा विषय होऊं शकतें याकडे संकेत केला. त्यांचे 'परीक्षागुरु' या दृष्टीने नि:संशय युगप्रवर्तक आहे. ठाकूर जगमोहन-सिंह यांचें 'श्यामास्वप्न' फारच कल्पनाप्रचुर असलें, तरी त्यांत ग्रामीण जीवनाचें सुंदर चित्र रेखाटलेलें आहे. अंबिकादत्त व्यास यांनी 'आश्चर्य वृत्तांत' मध्यें अद्भुत व अलौकिक वृत्तांत लिहिले आहेत. 'सौ अजान एक सुजान' व 'नूतन ब्रह्मचारी' या बाळकृष्णभट्ट यांच्या कथा उपदेशात्मक आहेत.

या प्रारंभींच्या काळांत लेखकांपुढे कांहीच विशिष्ट आदर्श नसल्यामुळें व कादंबरीतंत्राची नीट ओळखहि न झाल्यामुळें यापेक्षा उच्च दर्जाचें साहित्य निर्माण होणें शक्य नव्हतें. त्याकरिता मार्गदर्शनाची आवश्यकता होती.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही आवश्यकता बंगाली साहित्याने पूर्ण केली. इंग्रजी कथासाहित्याचा परिणाम बंगालीवर सर्वांत प्रथम झाला व या काळापर्यंत त्या भाषेंत बऱ्याच उत्कृष्ट कादंबऱ्या लिहिल्या गेल्या होत्या. हिंदी साहित्यांत पारिवारिक, सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्यांची परंपरा प्रस्थापित करण्याकरिता बंगाली कादंबऱ्यांचे अनुवाद होणें जरूर होतें व एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं तें सुरू झालेंहि ! हिंदी कथासाहित्याच्या बाल्यकालांत बंकिमचंद्र, रमेशचंद्र दत्त, शरद्बाबू, चारुचंद्र, रवींद्रनाथ ठाकूर व वंगभाषेंतील बाकी सर्व प्रसिद्ध कादंबरीकारांच्या पुस्तकांचे अनुवाद झाले. हे अनुवाद करणाऱ्यांपैकी पं. ईश्वरीप्रसाद शर्मा व पं. रूपनारायण पांडेय विशेष उल्लेखनीय आहेत. बंगाली साहित्यामुळे हिंदी कादंबऱ्यांना वळण लागलें व त्यांचा आदर्श उच्च झाला. हिंदी कथा-साहित्यावर पडलेला बंगालीचा प्रभाव व बंगालींतून अप्रत्यक्ष रूपाने आलेला इंग्रजी साहित्याचा प्रभाव यांकडे कोणालाहि डोळेझाक करतां येणार नाही.

आरंभकालांत लोकांना या वाङ्मयप्रकारांबद्दल फारशी रुचि नसल्यामुळे कादंबरीला विशेष प्रोत्साहन मिळालें नाही. ही आवड उत्पन्न करण्याचें काम देवकीनंदन खत्री यांनी ' चंद्रकान्ता ' व चंद्रकान्ता संतति ' लिहून केलें. हीं पुस्तकें साहित्याच्या कोटींत येण्याच्या योग्यतेचीं नाहीत, हें खरें व म्हणून त्यांना आपण खऱ्या अर्थाने कादंबऱ्याहि म्हणूं शकत नाही; परंतु देवकीनंदन खत्रींनी हिंदीकरता जितके वाचक निर्माण केले, तितके कोणीच केले नव्हते. हीं पुस्तकें इतकीं लोकप्रिय झालीं की, फक्त उर्दू लिपी जाणणारे किती तरी लोक ' चंद्रकान्ता ' व ' चंद्रकान्तासंतति ' वाचण्याकरिता देवनागरी लिपी शिकले. याचा परिणाम असा झाला की, कथासाहित्याबद्दलची अनासक्तीची भावना जाऊन बरेचसे लेखकहि या क्षेत्राकडे वळले.

गोपालराम गहमरी यांनी कांही ' डिटेक्टिव्ह ' –कथा लिहिल्या व कांही इंग्रजी ' डिटेक्टिव्ह '–कादंबऱ्यांचे अनुवाद केले.

बंगाली कादंबऱ्यांचे जे अनुवाद झाले, त्यांचा परिणाम होऊन त्या धर्तीवर कादंबऱ्या लिहिण्याचा पहिला प्रयत्न पं. किशोरीलाल गोस्वामींनी केला. या क्षेत्राकरिताच त्यांनी आपली लेखणी झिजवली व सामाजिक, पारिवारिक व ऐतिहासिक मिळून एकंदर ६५ कादंबऱ्या लिहिल्या ! यांच्या पुस्तकात चित्तवेधक वर्णनें, वासनांची मीमांसा, सजीव चित्ररेखा व थोडेफार स्वभाव-चित्रण देखील आढळतें. या दृष्टीने पाहिलें असतां पं. किशोरीलाल गोस्वामी यांना ' पहिला कादंबरीकार ' म्हणावयास हरकत नाही. याच काळांत बंगालीच्या प्रभावाने ज्यांत प्रबळ विचार, विकार, व भावना यांचें चित्रण मुख्य असतें अशा कांही भावप्रधान कादंबऱ्याहि लिहिल्या गेल्या.

परंतु तरीहि या युगांत फक्त बीजारोपणच झालें, असें म्हणायला हरकत नाही. अजून हिंदी कादंबरींत जीवनाचीं वास्तविक चित्रें यावयाचीं होतीं, काल्पनिक साम्राज्यांत गुंतून राजाराणीच्या कथा लिहिणें सोडून जीवनांतील विषमता, जटिलता व विविधता यांचें चित्रण करावयाचें होतें. प्रेमचंदांनी हिंदी कादंबरीचा धोपट मार्ग सोडून नव्या मार्गाचा अवलंब केला. कादंबरीचें नवें आधुनिक रूप घेऊन प्रेमचंद आखाड्यांत उतरले. हिंदी कादंबरीच्या शैशव कालांत त्यांनीं या क्षेत्रांत प्रवेश केला व ज्यावेळीं पार्थिव देहाच्या नाशाबरोबर आपलें वाङ्मयीन आयुष्य देखील संपविणें त्यांना भाग पडलें, त्या वेळेपर्यंत तिला चांगलेंच प्रौढत्व आलेलें होतें. त्यांनी हिंदी कथावाङ्मयाच्या बाल्यकालांत त्याला हातांत घेतलें व त्याची प्रगति होऊन तें विकसित होईपर्यंत हातभार लावला. संकुचित कुटुंबांतील परस्परसंबंधांपासून तर सामाजिक व त्याहिपेक्षा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विस्तृत राष्ट्रीय विषयांचा देखील त्यांनी विचार केला. भारतीय समाजाच्या अंतरंगाशीं प्रेमचंद चांगले परिचित होते व आपल्या संस्कृतीतील गुण व अवगुण दोन्हीहि ते डोळसपणाने पाहूं शकत होते. ईश्वरावर नसला, तरी मानवधर्मावर त्यांचा विश्वास होता. तिरस्कृत व उपेक्षित मानवांच्या उज्ज्वल बाजूची कल्पना त्यांना होती. म्हणूनच ते वेश्या, विधवा, भिकारी, मजूर, शेतकरी-सर्वांच्या मूकदुःखाला वाचा फोडूं शकले. कौटुंबिक जीवनांतील प्रश्न, सामाजिक अत्याचार व व्यक्तींची होणारी कुचंबणा, राजकीय चळवळी, भांडवलशाही, जमीनदारी व ग्रामीण समाजाचे हाल--सर्वच प्रश्न प्रेमचंदांनी हाताळले व अद्‌भुत निरीक्षणशक्ति व त्याहिपेक्षा अद्‌भुत वर्णन व भाषाशैली यांच्या बळावर हिंदी कथासाहित्याला विविधता व नाविन्य प्राप्त करून दिलें. त्यांनी लिहिलेल्या दहा, बारा कादंबऱ्यांपैकी 'सेवासदन,' 'रंगभूमी' 'कायाकल्प' व 'गोदान' या विशेष उल्लेखनीय आहेत. 'गोदान' तर भारतीय ग्रामीण जीवनाचें महाकाव्यच आहे! एका लेखकानें म्हटल्या प्रमाणें, परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें, असें म्हणतात; परंतु प्रेमचंदांच्या प्रतिभेच्या स्पर्शानें तर मातीचें देखील सोन्यांत रूपांतर होतें! प्रेमचंदांइतकी सुंदर व पात्रांवर-हुकूम बदलणारी भाषा देखील हिंदींत तोंपर्यंत कोणीच लिहिली नव्हती.

सामाजिक कादंबऱ्यांची जी परंपरा प्रेमचंदांनी सुरू केली, ती चालविणारे अनेक प्रति-भाशाली लेखक निघाले व आज हिंदीतील सामाजिक कादंबरीचें क्षेत्र अत्यंत विकसित झालें आहे.

विश्वंभरनाथ शर्मा 'कौशिक' यांनी आपल्या 'माँ' व 'भिखारिणी' या दोन्ही कादंबऱ्यांत मोजकींच पात्रें घेऊन व कथानकाची जास्त गुंतागुंत न करतां जीवनाच्या एखाद्याच अंगाचें चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि सुंदर संभाषणें, भाषेवरील प्रभुत्व व साधें-सुधें कथानक—यांमुळे त्या फारच हृदयस्पर्शी वठल्या आहेत.

हिंदु समाजांत धर्माच्या नांवाखालीं चाललेला गोंधळ व त्याचे दुष्परिणाम पाहून तत्त्वज्ञानी, कवि व नाटककार जयशंकर 'प्रसाद' कादंबरीक्षेत्राकडे वळले व आपल्या 'कंकाल' या कादंबरींत, हिंदू समाजाने जी सनातन धर्माची भिंत उभी केली आहे, तिच्या पाठीमागे किती अत्याचार आहेत व किती नवोत्फुल्ल निर्दोष जीवांना स्वतःचा कांहींहि अपराध नसतांना खोटे विश्वास व परंपरागत रूढ कल्पना यामुळें झालेला आयुष्याचा नाश उघड्या डोळ्यांनी पाहावा लागत आहे—हें चित्रित करून वाचकांना आपल्या प्रतिभेचा आणखी एक पैलू दाखविला. 'कंकाल' व भारतीय स्त्रीच्या आदर्शाचें चित्रण करणारी 'तितली' या दोन्ही कादंबऱ्यांत प्रसादजींची भाषा अत्यंत स्वाभाविक, पण तितकीच काव्यमय व मनोहर आहे. 'प्रसाद' मधील कवि कादंबरींतहि जागृत होता व म्हणूनच त्यांची सजीव दृश्यवर्णनें व मानसिक आंदोलनाचीं चित्रें यांत हृदयाच्या आंतल्या गाभ्याला स्पर्श करण्याची शक्ति आहे.

याच सुमारास हिंदी साहित्यांत पांडेयबेचन शर्मा 'उग्र' या प्रतिभाशाली लेखकाने प्रवेश केला व आपल्या ओघवती व ओजस्वी भाषेनें 'उग्र' या टोपणनांवाची सार्थकता सिद्ध करून दाखविली. परंतु हलक्या प्रसिद्धीच्या व पैशाच्या पाठीमागें लागून समाजाच्या घृणामय बाजूचीं भडक चित्रें रंगविण्यांत व वासना उद्दीप्त होतील अशा विषयांवर लिहिण्यांत त्यांनी आपली प्रतिभा खर्च केली! 'चंद हसीनोंके खतूत' कादंबरी, 'महात्मा ईसा' सारखें नाटक व 'उसकी मां' ही लघुकथा लिहिणाऱ्याने लक्ष्मीच्या लोभाला बळी पडून आपल्या प्रतिभेचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असा दुरुपयोग करावा, हे खरोखरच हिंदी साहित्याचें दुर्दैव होय! ऋषभचरण जैन यांनी प्रारंभीच्या काळांत प्रेमचंदांच्या धर्तीचें साहित्य निर्माण केलें, परंतु पुढे तेहि पैशाचा मोह आवरूं शकले नाहींत व त्यांनी 'उग्र' यांच्याच पावलावर पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला!

याशिवाय प्रताप नारायण श्रीवास्तव यांनी पाश्चिमात्याचें अनुकरण करणाऱ्या व 'सिव्हील-लाइन्स' मधून राहणाऱ्या उच्च वर्गाचीं यथार्थ चित्रें रेखाटलीं आहेत. राधिकारमण प्रसादसिंह यांची 'राम-रहीम' ही सुंदर सामाजिक कादंबरी आहे. अवधनारायण यांची 'विमाता' ही चांगलीच हृदयस्पर्शी वठली आहे. गोविंदवल्लभ पंत, चतुरसेन शास्त्री व चंडीप्रसाद 'हृदयेश' हे बऱ्यापैकी कादंबरीकार आहेत. भगवतीप्रसाद वाजपेयी यांनी 'प्रेमपथ' 'लालिमा' 'विकास' 'दो बहेने' व 'निमंत्रण' या साधारण बऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. प्रसिद्ध कवि सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' यांनीहि 'अप्सरा' 'अलका' व 'निरुपमा' लिहून हिंदी कथासाहित्याला आपल्या प्रतिभेची चुणूक दाखविली आहे. अनूपलाल मंडल हिंदींतील प्रगतीशील कादंबरीकार आहेत. त्यांनी प्रेमचंदाचें, त्याचप्रमाणें, 'उग्र' चेंहि अनुकरण केलें आहे. त्यांच्या नऊ-दहाहि कादंबऱ्या लोकप्रिय आहेत. भगवतीचरण वर्मा यांची 'तीन वर्ष' ही पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा परिणाम झालेल्या युवकांची कथा आहे व ती चांगली साधली आहे. या व्यतिरिक्त हजारो वर्षांपासून चालत आलेल्या पापपुण्याच्या कल्पनांची मार्मिक मीमांसा करणारी 'चित्रलेखा' लिहून वर्माजींनी खरोखरच हिंदी कथासाहित्याची शोभा वाढविली आहे.

कोणताहि मोठा सामाजिक प्रश्न सोडविण्याचा किंवा तत्त्वप्रतिपादनाचा अभिनिवेश न करतां साध्यासुध्या भाषेंत व कथानकांत साधसुधें ग्रामीण जीवन रंगविण्यांत सियारामशरण गुप्त अत्यंत यशस्वी झाले आहेत. त्यांच्या 'नारी' 'गोद' व 'अंतिम आकांक्षा' यांमध्ये ग्रामीण समाजांतील पारिवारिक संबंध व आदर्शांचा विचार न करितांच सहजपणें पाळले जाणारे आदर्श यांचें चित्रण दिसतें. गुप्तजी हिंदींतील अत्यंत प्रतिभाशाली लेखक आहेत व त्यांच्या 'नारी' चा अनुवाद इंग्रजींत देखील झाला आहे.

हिंदीमध्ये तीन भाषांतील प्रसिद्ध लेखक—बंगालीमधील राखालबाबू बंदोपाध्याय, मराठींतील हरी नारायण आपटे व गुजराथी मधील कन्हय्यालाल माणिकलाल मुनशी—यांच्या सुंदर ऐतिहासिक कादंबऱ्यांचे अनुवाद झाले आहेत. तरीहि हिंदी लेखकांचें लक्ष्य या क्षेत्राकडे आकृष्ट झालें नाही! पहिल्या काळांत किशोरीलाल गोस्वामींनी ऐतिहासिक कथा लिहिण्याचा प्रयत्न केला होता, परंतु कथानकाच्या काळाशी विसंगत अशी भाषा व चित्रें यांमुळे ते अगदीच अयशस्वी ठरले! हिंदी कथासाहित्यांतील ही त्रुटि भरून काढण्याचा यशस्वी प्रयत्न वृंदावनलाल वर्मांनी केला. हें मात्र खरें, कीं त्यांनी राखालबाबू, आपटे किंवा मुनशी या तिघांपैकी कोणाचेंच अनुकरण केलें नाही. व यांच्यापैकी कोणाच्याच उणिवेची पूर्ति केली नाही. इंग्रजींत ज्यांना रोमँटिक (romantic) म्हणतात, तशा प्रकारच्या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या व आपली एक निराळीच परंपरा प्रस्थापित केली. वर्माजींच्या 'लगन,' 'प्रेमकी भेट' व 'कुंडलीचक्र' या सामाजिक कादंबऱ्याहि सुंदर आहेत. परंतु त्यांचें खरें महत्त्व 'गढकुंडार' व 'विराटा की पद्मिनी' या ऐतिहासिक कादंबऱ्यांत आहे. बुंदेलखंडाचें भौगोलिक ज्ञान व त्यामुळे प्रसंग व घटनास्थळ यांचा सुंदर समन्वय, कथानकाची यशस्वी मांडणी, आदर्श स्वभावचित्रण व 'रोमँटिक' कादंबऱ्यांकरिता उपयुक्त अशी भाषा—या सर्वांमुळे वृंदावनलाल वर्मांच्या कादंबऱ्या अत्यंत मनोवेधक झाल्या आहेत. नुकतीच प्रसिद्ध झालेली 'झांसी की रानी' तर त्यांच्या यशाचा कळस आहे!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्या व तेथील साहित्याचा अभ्यास केलेल्या लेखकांनी हिंदी कादंबरीक्षेत्रांत प्रवेश केल्यामुळे मानवी मनाचें विश्लेषण करणाऱ्या मानसशास्त्रीय (Psychological) कादंबऱ्यांचा परिणाम हिंदी कथासाहित्यावर होणें अपरिहार्य झालें. ' घृणामयी ' लिहून इलाचंद्र जोशी यांनी या प्रकारच्या कादंबऱ्यांचा पायंडा घातला व त्यानंतर याच धर्तीवर ' परदेकी रानी ' ' संन्यासी ' वगैरे देखील लिहिल्या. जैनेंद्रकुमार यांनी आपल्या ' परख, ' ' त्यागपत्र ' व ' सुनीता ' या मध्ये मानसिक आंदोलनें व व्यक्तींच्या मनावरील क्रिया व प्रतिक्रिया यांचे फारच सुंदर दिग्दर्शन केलेलें आहे. त्यांची कट्टो बिहारी व सुनीता यांसारखीं पात्रें निःसंशय वाचकांच्या स्मरणांत राहातात. ' कल्याणी ' व ' अनामस्वामी ' यां मध्ये मात्र क्लिष्ट व बोजड तत्त्वज्ञानविषयक संभाषणांचीच इतकी रेलचेल झाली आहे की, स्वभावचित्रण, घटना व पात्रें यांना कांहींच महत्त्व उरलेलें नाही ! म्हणून त्यांना ' कादंबऱ्या ' म्हणणें देखील जरा कठिण आहे !

पुरोगामीत्वाच्या नांवाखाली स्त्री-पुरुषांमधील संबंधांत अनिर्बंध स्वातंत्र्याचें प्रतिपादन करणाऱ्याहि कांही कादंबऱ्या हिंदीमध्ये प्रकाशित झाल्या. या लेखकांची भाषा संयमित होती व त्यांनी फार भडक व वासना जागृत करणारीं वर्णनेंहि केलीं नव्हतीं, हें खरें; परंतु अनिर्बंध लैंगिक स्वातंत्र्याचीच शिकवण त्यांनी दिली ! सर्वदानंद वर्मा यांनी ' नरमेध ', ' नरक ', ' निकटकी दूरी ' व ' रानीकी डायरी ' ह्या कादंबऱ्या लिहून ही शिकवण दिली ! ब्रजेंद्रनाथ गौड यांच्या कादंबरींत क्रांतिकारकांच्या पार्श्वभूमिवर लैंगिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे !.

हिंदी साहित्याच्या अत्याधुनिक काळांत कादंबरीकार म्हणून ' अज्ञेय ' यशपाल, राहुल सांकृत्यायन व रांगेय राघव यांचें स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

सच्चिदानंद हीरानंद वात्स्यायन ' अज्ञेय ' यांनी काव्य, लघुकथा व कादंबरी या तीनहि क्षेत्रांत आपल्या अलौकिक प्रतिभेचा परिचय दिला आहे. ' शेखर-एक जीवनी ' ही तीन खंडांत विभाजित केलेली एकच कादंबरी त्यांनी लिहिली आहे. तींत त्यांनी एका तरुणाचें लहानपणापासूनचें पारिवारिक, सामाजिक व जागतिक संबंध व त्या सर्वांच्या त्याच्यावरील प्रतिक्रिया यांचें अतिशय सुंदर दिग्दर्शन केलेलें आहे. ' शेखर ' हिंदुस्थानांतील सर्वच भाषांत अनुवादित करावयाच्या योग्यतेची आहे.

शरद्बाबूंनी ' पथ के दावेदार ' (भारती) लिहून क्रान्तिकारकांना निव्वळ आदर्शवादी, कल्पनेच्या साम्राज्यांत विहार करणारे व सत्य सृष्टीपासून दूर असें चित्रित केलें होतें. या उलट हिंदींतील यशस्वी लघुकथालेखक यशपाल यांनी क्रान्तिकारकांना वास्तववादी व साधारण मनुष्यांप्रमाणे गुणदोषयुक्त दाखविण्याकरिता ' दादा कॉम्रेड ' लिहिली. या कादंबरीशी मराठी वाचक देखील परिचित आहेत. ' देशद्रोही ' या त्यांच्या दुसऱ्या कादंबरींत जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर १९४२ सालापर्यंतची हिंदुस्थानची सामाजिक व राजकीय परिस्थिति व प्रतिक्रिया यांचें फारच सुंदर दिग्दर्शन केलेलें आहे. यशपाल यांनी हिंदी कम्युनिस्ट पक्षाकरिता ' देशद्रोही ' लिहिली व म्हणून कलेच्या दृष्टीने तिला फारसें महत्त्व नाही, असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाही ! कारण त्यांत कम्युनिस्ट पक्षावर टीका देखील आहे. प्रगतिवादी लेखकांना शाश्वत टिकणारें साहित्य काय निर्माण करता येणार—या लब्धप्रतिष्ठित साहित्यिकांच्या उपहासात्मक टीकेचें जणू आव्हान स्वीकारून त्यांनी लिहिलेली ' दिव्या ' तर अत्यंत सुंदर आहे. बौद्धधर्माच्या ऱ्हासकालांत ज्यावेळी बौद्ध व ब्राह्मण धर्मांत संग्राम चालू होता, त्या काळाच्या पार्श्वभूमीवर मानवी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनांतील कांहीं शाश्वत सत्यांचें परिशीलन करणाऱ्या या कादंबरीचा खरोखरच शाश्वत साहित्यांत समावेश होण्यास कांहींच हरकत नाही. यांतील भाषा संस्कृतप्रचुर व ज्या वातावरणांतील कथानक आहे त्याला अनुरूप अशीच आहे. ' दिव्या ' लिहून यशपाल यांनी आपल्या बहुमुखी प्रतिभेची साक्ष पटविली आहे. त्यांनी ' पार्टी कॉम्रेड ' नांवाची आणखी एक छोटीशी कादंबरी लिहिली आहे. तींत त्यांनी मुंबईतील मवाल्यांचें चित्र रेखाटून चांगली शिकवण मिळाली तर त्यांची देशभक्ति देखील कशी जागृत होऊं शकते, हें ' नाविकांच्या बंडा ' च्या पार्श्वभूमीवर दाखविलेलें आहे. यशपाल यांनी हिंदी साहित्याला अभिमान वाटावा अशी ' देणगी ' दिलेली आहे. ते आयुष्याच्या मध्यकालांत आहेत व अजून हिंदी कथा साहित्याला त्यांच्याकडून पुष्कळ साहित्य मिळविण्याची आशा आहे.

हिंदी भाषेचें भाग्य म्हणून ' आंतरराष्ट्रीय किर्ती मिळविलेले पुरा तत्त्ववेत्ता व प्राच्यविद्यापंडित राहुल सांकृत्यायन हिंदी साहित्याकडे वळले व त्यांनी आपल्या विद्वत्तेच्या साहाय्याने एका निराळ्याच प्रकारच्या सांस्कृतिक कादंबऱ्या निर्माण केल्या. ' सिंहसेनापती '—मध्ये बुद्धाच्या काळची व ' जय यौधेय ' मध्ये समुद्रगुप्त—चंद्रगुप्ताच्या वेळची सांस्कृतिक परिस्थिति कशी होती व साधारण जनतेला प्रगतीकरता किती वाव होता, हें चित्रित केलेलें आहे. राहुलजी मुळांत कादंबरीकार नसल्यामुळे कधी कधी त्यांच्यांतील पुरा तत्त्ववेत्ता कलाकाराच्या आड आलेला दिसतो; परंतु तरीहि ज्या कौशल्याने त्यांनी कथानकांची रचना केली आहे व सांस्कृतिक जीवनाची कल्पना आणण्याचा प्रयत्न केला आहे, ' तें त्यांचे कौशल्य खरोखरच वाखाणण्यासारखें आहे. ' विस्मृतिके गर्भमें ' व ' शैतानकी आँख ' या शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून लिहिलेल्या, परंतु निव्वळ कल्पनेवर आधारलेल्या कादंबऱ्या हृदय थरारून सोडणाऱ्या व तरुणांना उत्साहित करणाऱ्या आहेत.

समाजांतील दंभ, पिळवणूक, अत्याचार व अनाचार याबद्दल तीव्र चीड असलेले व ही चीड अत्यंत भावपूर्ण व ओजस्वी भाषेंत व्यक्त करणारे नवोदित तरुण लेखक रांगेय राघव हे होत. आतापर्यंत त्यांची ' घरौंदे ' नांवाची एकच कादंबरी प्रकाशित झाली आहे व तिचें स्वागतहि चांगलें झालें आहे. परंतु सुंदर दीर्घकथा निर्माण करून व बंगालच्या दुष्काळाच्या वेळीं ' रिपोर्टाज ' लिहून त्यांनी हे सिद्ध करून दिलें आहे की, त्यांच्यामध्यें ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय–सर्वच प्रकारचें वातावरण उत्पन्न करण्याची शक्ति आहे.

प्रेमचंदांनी हिंदी कादंबरीला मानवी जीवन त्यांतील घटना व भावना यांचें दिग्दर्शन करण्याचें अत्यंत प्रभावी साधन बनविलें; वृंदावनलाल वर्मा व जैनेंद्रकुमार यांनी या वाङ्मयप्रकाराच्या विकासकालांत त्याच्यांत विविधता आणून त्याला स्थायित्व दिलें; व अत्याधुनिक कालांत ' अज्ञेय ' व यशपाल यांनी नवें तंत्र व नवे प्रयोग समाविष्ट करून कादंबरीला हिंदी साहित्यांतील सर्वांत महत्त्वाच्या अंगांपैकी एक बनविलें आहे.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अजून हृदयें जोवर असतिल-

अजून हृदयें जोवर असतिल
तोवर अपुलें—मागे वर्षणें-
कधिं न सम्पणें कधी खरोखर !
—संसाराची अशीच शिक्षा
अता मिळाली जर अपुल्याला,
प्रिय—विश्वांतिल अमूर्त स्वप्नें—
स्पर्शुन जातां भग्न कडांना,
—द्विगुणित होतिल दुःखें अपुलीं !

भ्यालेल्या अन् बावरलेल्या
सक्तीने अन् पिटाळलेल्या
हृदयांतुन गे जें जें येइल—
तें तें होइल शापित केवळ !

सुप्त जगाचीं अपुलीं स्वप्नें
अजून वठतिल तेजोगर्भ,
कर्णपथावर अजून नादिल
चिर—विरहाचा अपुरा सर्ग,
अजून विषयी बण्डखोर हे-
भाव आपुले स्फुन्दुन कुढतिल !

विचित्र परि हा प्रवाह उलटा
किती चढावा पहाड लंघुन,
काळांतिल अन् क्रुद्ध भविष्या—
रोष आपुला साहिल कुठवर !

क्षणांत मिष्किल नजरेने जो
अपूर्व स्वप्नें निर्मित जातो,
उषःकालच्या भल्या दुव्याने-
रेटित अपुला पथ आक्रमितो,
क्षणाक्षणाला व्यवहारीं जो
अघटित घटना विजयी करितो,
—तो 'काल'च गे, दुभंग अपुल्या
प्रतिवाटांतुन प्रवास करितो !

हृदयें जोवर तोवर स्फुंदूं,
मन हें हळवें तोवर स्फुंदूं !
प्रवाह उलटा म्हणुनी लंघुन—
पहाड जाइल काय !
—कठोर निर्दय ' काल ' परन्तू-
जीवित भंगुन जाय !

—द्वारकानाथ चित्रे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चंद्रप्रकाश

मुळ लेखक– गाय् डी मोपासाँ
अनुवादक– द. चिं. सोमण

* * *

गाय् डी मोपासाँ (५ ऑगस्ट १८५०-६ जुलै १८९३) ह्या फ्रेंच लघुकथालेखकाच्या कथा कथानकप्रधान आहेत. फ्रेंच लोकांचें फ्रान्समधील जग मोपासाँने आपल्या कथांत रंगविलेलें आहे ही जाणीव नसलेला वाचक ह्याच्या कथा वाचतांना थोडाफार बावरून जाण्याचा संभव आहे. नीतिभ्रष्ट व्यक्तींच्या जीवनांतील घटनांभोवतीं ह्याने आपल्या कथानकांचीं जाळीं विणल्यामुळें कांही इंग्रजी व अमेरिकन टीकाकारांनी प्रतिकूल टीका केलेली आहे! तथापि लिओ टॉल्स्टॉय् ह्यांनी "मोपासाँची भेदक दृष्टि मानवी जीवनसागराचा तळ निरखून बघते" – अशा आशयाचें शिफारसपत्र ह्याला दिलेलें आहे आणि अनातोल फ्रान्स म्हणतात, "ताकद, लवचिकपणा, प्रमाणबद्धता सारें कांही ह्या निर्दोप प्रकृतीच्या कथालेखनपद्धतींत आहे!"

मादाम जूली रूवीअर आपल्या वडील बहिणीची वाट पहात होती. तिचें नांव हेन्रीएट लीटोअर आणि ती नुकतीच स्वित्झरलँडला जाऊन परत आलेली होती.

तिला जाऊन साधारणपणें पाच आठवडे झालेले होते. कॅलव्हाडॉस येथे लीटोअर दांपत्याची मोठी इस्टेट होती व तिथलें कांही काम पुरें करण्याकरिता हेन्रीएटचा नवरा प्रवासांतून अगोदरच परतला होता. तें काम आटोपल्यावर तो मादाम जूली रूवीअरकडे पॅरिस येथे आलेला होता!

संध्याकाळ होत होती. खोलींतल्या अंधुक होत जाणाऱ्या उजेडांत मादाम रूवीअर एका हातांत पुस्तक घेऊन बसलेली होती. वाचनांत तिचें लक्ष्य असतें, तर नक्की तिचे डोळे दुखायला लागले असते.

कुठेहि थोडासा आवाज झाला की, रूवीअरला वाटे, आली हेन्रीएट!

अखेर एकदाची द्वारघंटिका वाजली व मादाम हेन्रीएट लीटोअर प्रवासी पोशाखांतच तिच्यासमोर येऊन उभी राहिली. कांहीहि न बोलतां त्या दोघींनी अनेकवेळां एकमेकाना प्रेमाने कवटाळलें आणि मग कितीतरी वेळाने परस्परांचे कुशल विचारायला त्यांनी आरंभ केला. तुटक तुटक वाक्यें उच्चारीत अनेक गोष्टींबद्दल त्या बोलल्या!

चांगलाच काळोख पडला होता आता, मादाम रूवीअरने दिवा आणण्याचा हुकूम सोडला व दिवा आल्यावर त्याच्या उजेडांत पुन्हा एकदां बहिणीला आलिंगन द्यायला सरसावतांना तिने तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें.

दचकल्यागत झाली ती! मादाम लीटोअरच्या सुरेख भालप्रदेशावर पांढऱ्या केसांच्या दोन बटा तिला दिसल्या, कपाळाच्या दोन्ही बाजूंकडून ते दोन चिमुकले रूपेरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निढ़ीर तिच्या दाट काळ्या केशकलापांत घुसले होते. हेन्रीएट तिची वडील बहीण खरी, पण तिचें वय होतें अवघें वीस आणि चार वर्षें ! त्या पांढऱ्या बटा ती प्रवासाला जायला निघाली तेव्हां काळ्या होत्या !

मादाम रूबीअरचा पाय पुढे पडेना ! हेन्रीएटला किती मानसिक त्रास झाला असावा, ह्याची तिला कल्पना आली, परंतु इतकें त्रासदायक त्या पांच आठवड्यांत काय घडलें असावें, हें तिला कळेना. तिच्या डोळ्यांत अश्रु जमायला लागले.

" काय झालें तुला, हेन्रीएट ? "

जिचें हृदय दुखावलेलें असतें, ती व्यक्ति हंसली, तर कशी चमत्कारिकच हंसते. मादाम लीटोअर तशीच हंसली आणि म्हणाली,

" कुठं काय ? माझे पांढरे केस पाहिलेस वाटतं ?"

" काय झालं बोल अगोदर ! " सांग काय तें ! मला फसवतां यायचें नाहीं तुला, लक्ष्यांत ठेव, काय ? बोल ! ! "

एकदोन मिनिटें एकमेकींकडे बघत त्या तशाच उभ्या राहिल्या. मादाम लीटोअर अगदी पांढरीफट्टक पडली होती व तिच्याहि पापण्या अश्रूंत भिजत होत्या.

" काय झालं ? सारं मनमोकळेपणानं सांग, बोल ना, काय झालं ? हं, सांग बरं ! "

ऐकूं येईल न येईल इतक्या हलक्या आवाजांत मादाम लीटोअर पुटपुटली !

" मी— मी— मी— व्यभि—माझा एक प्रियकर आहे ! " —आणि, मादाम रूबी-अरच्या खांद्यावर मान टेकून ती स्फुंदायला लागली.

तिचें भरदार वक्षस्थल कांहीं वेळानें आपोआपच वरखालीं व्हायचें थांबलें व सारें सांगून टाकायला ती उत्सुक झाली. हृदयावरचें तें दडपण केव्हा एकदा दूर ढकलूं, असें तिला झालें होतें.

एकमेकींचे हात घट्ट धरून त्या दोघी कोपऱ्यांतल्या अंधारांतल्या कोचावर जाऊन बसल्या. मादाम रूबीअरनें मादाम लीटोअरच्या गळ्यांत हात टाकून तिला अगदी जवळ ओढलें आणि तिचें मस्तक आपल्या छातीवर घेतलें.

मादाम लीटोअर सांगायला लागली—

* * *

" मला वेड लागलं होतं की काय, देव जाणे ! मी तशी कां वागलें, हें माझं मलाच अजून कळत नाही, बघ ! जूली ! सांभाळ बरं ! अगदी सांभाळून वाग ! माझ्या अनुभवावरून ताबडतोब धडा घे. आपलं स्त्रियांचं हृदय कसं असतं, हें माझ्यावरून ओळख. कांहीं कांहीं मोहांना आपण तात्काळ बळी पडतों, हें विसरूं नकोस, हं ! अगदी एकाकी असं अकारण एखाद्या वेळीं वाटतं, वाटतं की, कुणाला तरी बाहुपाशांत घट्ट आवळून धरावं, खूप प्रेम करावं, काय नी काय !

माझा नवरा कसा आहे ठाऊकच आहे तुला आणि, माझं त्याच्यावर किती प्रेम आहे, हें मी तुला सांगायला हवं, असंहि नाही. सज्जन आहे तो, परोपकारहि करतो थोडा फार, हसत-मुखहि असतोच; सज्जनाची व्याख्या त्याच्यावरून ठरवावी. जसा काल, तसा आज आणि उद्याहि

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तसाच—असा आहे बिचारा ! किती तरी वेळां मला वाटतं की, कुठून तरी अचानक येऊन त्याने आडदांडपणा करीत मला जवळ ओढून घ्यावं, खूप आवेशाने आलिंगन द्यावं आणि मग अगदी मोजून, अगदी हळूवारपणें माझी सावकाश चुंबन घ्यावींत. त्या चुंबनानं माझं हृदय शांत होईल बघ; आम्ही पूर्ण एकरूप होऊं; जाऊं दे ! माझंच नशीब म्हणायचं ! अनेक वेळां वाटतं की, तो अगदी निराळ्या स्वभावाचा हवा होता. भावनांना त्याच्या जीवनांत महत्त्वाचं स्थान हवं होतं म्हणजे मग मी त्याच्यासाठी कासावीस व्हावं, असं वाटलं असतं त्याला. मग माझे अश्रू त्याने ओठानेच पुसले असते. पण त्याचं पहावं, तों सारं उलटंच. मी रडतांना दिसलें तरी दूर उभा राहून मला डोळे पुसायला सांगेल तो !

मूर्खासारखं बोलतें आहे मीं, असं वाटेल तुला, पण मी सांगतें हें सत्यकथन आहे. आपण स्त्रिया अशाच जन्माला येतों; आपला काय इलाज त्याला !

इतकं असलं तरी त्याच्याशीं कधी प्रतारणा करावी, कधी त्याला फसवावं, ही इच्छा मला कधीहि झाली नाही. आणि, जें घडलं, तें कसं घडलं, माझ्या इच्छेविरुद्ध कां घडलं, हें मलाच समजत नाही. त्या दिवशीं ल्यूसेर्नेच्या सरोवरावर तसा प्रकाश पाडीत जर चंद्र उगवला नसता, तर ही घटना घडलीच नसती !

प्रवासांत माझा नवरा बरोबर होताच; त्याची व्यवहारदक्षता, त्याचा शुष्कपणा हींहि अर्थात् त्याच्याबरोबर होतींच ! नेहमीसारखाच किंचित् परकेपणानेंच वागायचा तो ! माझा सगळा उत्साह, काव्यमय जीवन जगायची सगळी इच्छा ह्या प्रवासांत चिरडून टाकली त्याने ! घोड्याच्या गाडींत बसून त्या उंच उंच डोंगराच्या उतरणी पहाटे उतरतांना अवर्णनीय नेत्राकर्षक दृश्यें क्षणाक्षणाला डोळ्यांसमोरून सरकायचीं ! दूर दिसणारी चिमुकलीं खेडीं, त्या खूप खोल दऱ्या, दाट जंगलं, लहानमोठे निर्झर·········आनंदाने प्रफुल्लित होऊन मी टाळ्या वाजवायला लागायचा व म्हणायची, “किती छान सुरेख दिसतं रे हें सगळं, “खूप चुंबनं घे ना माझीं !”–आणि तो !–तो नेहमीसारखा थोड्याशा परकेपणाने हसायचा व म्हणायचा, “वा ! तुला हें सृष्टिसौंदर्य आवडण्याचा आणि मी तुझीं चुंबनं घेण्याचा संबंध कळत नाही मला !–कशाला घ्यायचीं ?”

आणि, त्याच्या त्या शब्दांनी माझं हृदय अगदी गोठून जायचं ! ज्या व्यक्ति परस्परांवर अनुरक्त आहेत, त्यांनी सृष्टिसौंदर्याच्या सान्निध्यांत देहभान विसरून आलिंगनं द्यावीं, हेंच मला नैसर्गिक वाटतं, बघ !

माझं हृदय दुभंग करून माझी विशुद्ध सुखाची लालसा बाहेर यायला बघत होती आणि तो क्षणोक्षणीं तिला रोधीत होता. बंद केलेल्या भांड्यांतील वाफेचा दाब वाढत जावा, तसं झालं होतं माझं ! हॉटेल डी फ्ल्यूलेनमध्ये चार दिवस आम्ही काढल्यानंतरची गोष्ट !

एकदम मला अत्यंत एकाकी वाटायला लागलं–चमत्कारच घडला तो !—माझ्या स्वतःच्या, प्रेमशून्य म्हण की, एकेरी म्हण, जीवनाविरुद्ध प्रचंड बंड करावं, हेंच माझ्या मनानं घेतलं एकदम !! कधी म्हटल्या कधी चांदण्यांत आवेशाने मला बाहुपाशांत घेऊन माझीं चुंबनं घेत सुटणारा पुरुष माझ्या नशिबीं नव्हता, ह्याची तीव्र जाणीव माझं अंतःकरण पोळायला लागली ! ज्या ओठांच्या स्पर्शांनी मी देहभान विसरून जाईन, असे ओठ माझ्या ओठांना कधीच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागायचे नव्हते !—अशा रात्री केवळ प्रेमाकरितां असतात आणि त्या प्रेमाला मी पारखी झालेली होतें ! त्या तशा चांदण्यांत तशा प्रेमाचा अनुभव मला कधीच येणार नव्हता का ?......

वेड्यासारखी रडत सुटलें मग मी ! रॉबर्टचं डोकं मधून मधून दुखतं, ठाऊक आहे ना तुला ? तसंच त्या दिवशीं संध्याकाळपासून दुखायला लागलं, त्यामुळे तो जेवण आटोपल्याबरोबर मुळीं जाऊन झोपला आणि मी बसलें तशी अश्रु गाळीत ! मनुष्य रडेल—रडेल तरी किती ! रडण्याचा देखील कंटाळा आला, म्हणून अखेर बाहेर पडलें हॉटेलांतून आणि त्या सरोवराच्या काठाकाठाने लागलें हिंडायला !

इतकी सुंदर रात्र होती ती ! स्वर्गांत जर रात्र होत असेल, तर तशीच असेल, बघ ! पूर्ण वाटोळा चंद्र अगदी डोक्यावर होता आकाशांत आणि ते उंच पर्वत चांदीचे मुकुट डोक्यावर ठेवून बसले होते;—त्यांच्या शिखरांवर बर्फ असल्यामुळे तसे दिसत होते ते !—सरोवराच्या पाण्यावर लहान लहान लहरी उठत व त्या चमकत ! इतकं प्रसन्न, मंगल होतं तें सारं ! अशा वेळच्या झुळुका कशा सुखद असतात माहीत आहे ना तुला ? असं वाटतं, झुळूक आपल्या देहाला अडत नाही, तर देहांतून आरपार पलीकडे जाते.....आणि त्या सर्वांमुळे मन अगदी हळवं झालं माझं ! भावनाप्राधान्य तर असं असीम वाढलं.........!

गवतावर बसलें मी आणि त्या प्रशांत रम्य सरोवराकडे पहायला लागलें !......पुन्हा रडायला यायला लागलं मला, अश्रु आवरतां आवरेनात !...... माझ्या मागे पावलं वाजलीं म्हणून मीं वळून पाहिलं, तों एक पुरुष माझ्याकडे निरखून बघत होता ! मी चेहरा त्याच्याकडे फिरविल्याबरोबर त्यानं मला ओळखलं !

" मादाम ! आपल्या डोळ्यांत पाणी ! "

एक तरुण बॅरिस्टर होता तो ! आपल्या आईबरोबर प्रवासाला निघालेला होता आणि आम्ही पुष्कळ वेळां भेटत असूं ! माझं लक्ष्य नसलं, म्हणजे माझ्याकडे तो टक लावून बघे, हें माझ्या पूर्वीच ध्यानांत आलं होतं !

त्याला काय उत्तर द्यावं, हेंच मला सुचेना ! गोंधळून गेलें होतें मी अगदी ! " मला बरं नाही ! " एवढंच मी म्हटलं आणि चालायला लागलें !

तोहि माझ्याबरोबर चालायला लागला आणि अगदी सभ्य पद्धतीने ! आम्ही प्रवासांत काय काय गमती पाहिल्या, ह्याचं वर्णन तो करायला लागला. अनेक वेळां अनेक स्थळं पाहून मला जें वाटलं, तें तो शब्दांनी स्पष्ट करायला लागला ! प्रवासांत ज्या ज्या गोष्टींनी माझं हृदय उचंबळून आलं होतं, नेमक्या त्याच गोष्टींबद्दल तो बोलत होता आणि त्याच गोष्टींबद्दल माझ्या लक्षांत आल्या नव्हत्या, अशा किती तरी गमती त्याने सांगितल्या ! सारा प्रवास पुन्हा मी करीत आहे, असंच वाटायला लागलं मला !

आणि, हें सारं सांगतां सांगतां तो मध्येच चालायचा थांबला आणि आल्फ्रेड डी मुसेट्च्या कांही काव्यपंक्ती मोठ्याने म्हणायला त्याने सुरुवात केली !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भावनांच्या झंझावातांत सांपडलें मी ! मला श्वासोश्वाससुद्धा धड करतां येईना ! काय वाटलं सांगतांच येत नाही, बघ ! ते पर्वत, तें सरोवर, तो चंद्रप्रकाश–ही सारीं कुठल्या तरी अत्यंत सुखद गोष्टीबद्दल कांही तरी गाणं माझ्या कानांत नाजुक आवाजांत म्हणत आहेत, असाच भास झाला....

...... आणि, तें घडलं ! 'कसं ?' तें मला ठाऊक नाही ! 'का ?' तेंहि कळत नाही !! जसं कांही स्वप्नच पडत होतं तें !!

तो पुन्हा मला जायच्या दिवशीं सकाळी भेटला; मध्यंतरीं भेटलाच नाही !

त्यानें आपल्या नांवांचं कार्ड मला दिलं !!

❀ * ❀

मादाम ल्विटोअर पुन्हा कण्हायला लागली.

मादाम रूबीअर विचारी मुद्रेने गंभीर आवाजांत म्हणाली—

"हें बघ ! पुष्कळ प्रसंगीं आपण स्त्रिया पुरुषांवर प्रेम करीत नाही, प्रेमावरच प्रेम करतों ! त्या रात्रींचा तुझा प्रियकर तो 'चंद्रप्रकाश' होता !! समजलं का मी काय म्हणते तें ?"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भिडले होते नभा !

भिडले होते नभा
राजप्रासाद तुंग
गडगडले खाली
आज पद–धूळींत ! ॥ १ ॥

गर्वाने नी ताठ्याने
शोभलीं सिंहासनें
कोलमडलीं सारीं
आज पद–धूळींत ! ॥ २ ॥

मदांध फडफडे
साम्राज्यशाही–ध्वज
पडले ते सारेही
आज पद–धूळींत ! ॥ ३ ॥

विश्वमोलाचे मुकुट
शोभले राजभालीं
धडधडले खाली
आज पद–धूळींत ! ॥ ४ ॥

खोपटी चंद्रमौली
दीनदलित आसनें
लोकशाही पताका
आज वर उंचावत ! ॥ ५ ॥

भावी काळचे राजे
आज मजूर किसान
त्यांचेच जयध्वनी
घुमती अंबरांत ! ! ६ ॥

—नारायण नागोराव हूड

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केशवसुतांची स्वप्नसृष्टि

लेखांक ४ था

श्रीराम अत्तरदे, एम्. ए.

● प्रस्तुत लेखमालेचा तिसरा हप्ता आक्टोबर अंकांत आला आहे. ही लेखमाला पुढील खेपेस समाप्त होईल.

★ ★ ★

४ सामाजिक भूमिकेचा कालखंड

'नरांलागी येथे नरचि चरणांही तुडवितो' यामागे उद्धृत केलेल्या ओळींतील कवींचा अभिप्राय सामाजिक विषमता व अन्याय यांस अनुलक्षून आहे, व ही सर्व विषमता, अन्याय, श्रेष्ठकनिष्ठ भाव वगैरे भेदाभेद जिच्यांत नाहीत, ती 'सृष्टी' वा तो 'निसर्ग' खरोखरीच उपासनीय होय, ही कवींची भूमिका. ज्यांच्या वाचनाने कवींच्या मनावर हा संस्कार बिंबला असावा, ते वर्ड्स्वर्थ, कीट्स् वगैरे पुष्कळ इंग्रजी कवि निसर्गाची भक्ति करण्यांत इतके पुढे गेलेले होते की, त्यांत त्यांना जीवनाचा सगळा अर्थ, सगळी नीति व हेतु-परिणति यांचें सर्वस्व आढळत होतें. 'सृष्टी'ची वा 'निसर्गा'ची ही कल्पना आदर्श म्हणून पुढे ठेऊन ऐहिक जीवनाचा धि:कार करण्यांत इंग्रजी एवंच केशवसुतादि कांही मराठी कवींच्या काव्याचें सर्वस्व सामावलेलें होतें. 'स्वयंभू सृष्टीचे नियम सुधरूं पहात असे', म्हणून मानव दु:खी कष्टी झाले आहेत, निसर्गापासून दूर गेल्यामुळेच उत्तरोत्तर मानवांत दु:ख, भेदभाव, अन्याय, हीं वाढत गेलीं, हा त्याचा अर्थ होतो. ऐतिहासिक दृष्टीकोनांतून पाहता सामाजिक विषमतेची व दु:खांची ही मीमांसा सपशेल चुकीची आहे. मराठी कवितेंत ही निसर्गोपासना नव्यानेच आल्यामुळे ती वाचकांना आकर्षिती झाली, एवढेंच काय तें. तेव्हा, या विचारसरणीचें— परिपूर्ण, भेदाभेदरहित, स्वयंभूसृष्टीच्या विचारसरणीचें—हें एक अंग पूर्णपणें चुकीचें आहे. आता; सामाजिक दु:खांची ही मीमांसा चुकीची असली, तरी केशवसुतांच्या काळांत त्यांचें एक कार्य फार बहुमोलाचें होतें, तें म्हणजे सामाजिक विषमतेचा व अन्यायांचा जळजळीत निषेध होय. बदलत्या जमान्यांतील विध्वंसनाचीही महत्त्वाची बाजू केशवसुतांनी प्रभावी रीतीने सांभाळली. आता, गद्य-लेखक, समाजसुधारक,—वगैरे धुरीणांच्या प्रयत्नांत केशवसुत आपल्या परीने वाटेकरी होते, हाच या विधानाचा अर्थ. एकट्या कवींनाच या कार्याचें श्रेय देतां येत नाही. एकूण, सामाजिक दु:खें व विषमता यांची मीमांसा व त्यांतील इलाज, आदर्श समाजव्यवस्थेची रचना, यांबाबत केशवसुतांकडे बघून चालणार नाही; याबाबतींत त्यांचे विचार सपशेल चुकीचे, किंबहुना, प्रतिगामी होते. कारण आंग्ल संस्कृतींतील अवतारकार्य संपलेल्या विचारसंप्रदायांतून ते उसने घेतलेले होते; तथापि सामाजिक विषमता व अन्याय यांचा उच्चरवाने धि:कार करणारा दुसरा कवि त्या काळांत (गद्यलेखक व समाजसुधारक वजा जातां) क्वचीच झाला नाही. केशवसुत या दृष्टीने बंडखोर कवि ठरले. त्यांची बंडखोरी ही कितपत आमूलाग्र व कडवी होती इत्यादि प्रश्नांचा परामर्श नंतर घेतां येईल. एवढें मात्र खरें की, तत्कालीन सामाजिक

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषमता व अन्याय हीं त्यांतील विशिष्ट समाजव्यवस्थेमुळे निर्माण झाली होतीं व जें स्वत: एका विशिष्ट अर्थव्यवस्थेवर अवलंबून होतें, त्या सरंजामदारी युगाविरुद्ध केशवसुतांची बंडखोरी होती. तत्कालिन वर्धिष्णु एतद्देशीय बूर्झ्वा (भांडवलदारी) आर्थिक मूल्यांच्या प्रस्थापनेस हें कार्य पोषकच होतें, यांत शंका नाहीं. भांडवलदारी अर्थव्यवस्था ही मध्यमवर्गाच्या साहाय्याने सरंजामशाहीने तट पाडून आपणांला अनुकूल अशी भांडवलदारी लोकशाही व समाजव्यवस्था निर्माण करीत असते. केशवसुतांच्या कामगिरींत हेंच मुख्य रहस्य होतें. सरंजामदारी समाजव्यवस्थेतील सामाजिक अन्यायांचा व विषमतेचा धि:कार करण्यासाठी त्यांनी 'दीर्घ किंकाळीने' 'तुतारी' फुंकून समाजाला जागें करण्यात इतर क्षेत्रांतील समाजसुधारकांबरोबर भाग घेतला. १८५० च्या सुमारास 'लोकहितवादींनी' जें कार्य केलें, तेंच पद्यरचनेच्या रामबाण शक्तीच्या जोरावर १८९० नंतर केशवसुतांनी केलें. या कार्यांत अन्यायग्रस्तांविषयींच्या भूतदयेचा कधी भाग असेल, कधी सर्व तुच्छतावादाची चीड असेल, कधी वैयक्तिक जिकिरींतून निर्माण होणारा स्वयंकेंद्रित दु:खवाद असेल, कधी 'निसर्गा' पासून दूर गेल्यामुळे मानव दु:खी झाल्याच्या भ्रामक तत्त्वज्ञानांतून आलेला कळवळा असेल, तर कधी अधिकच जाणवणारी ऐहिक गोष्टींबद्दलची जीवनपराङ्मुखता असेल; परंतु त्यांतहि एक गोष्ट सत्य आहे, ती ही की, या सर्व प्रकारांचें मूळ सामाजिक दु:खें व अन्याय याबद्दलची चीड हेंच—अगदी हेंच होय. ही चीडच केशवसुतांच्या ओजस्वी त्याप्रमाणेच गूढ मधुर रचनेतून प्रगट वा प्रच्छन्न रीतीने मूलस्थानी आढळून येईल. समकालीन जमान्यांतील बदलाचें हें मुख्य सूत्र होतें.

'आपण नीच आहोंत' ही भावना श्रमिक व दूर लोटलेल्या सामाजिक घटकांत सरंजामदारी युगाने खोलवर भिडवलेली होती, म्हणूनच चोखामेळ्यासारखे समाजाच्या खालच्या थरांतले कवीसुद्धा 'तुमच्या महाराचा मी महार,' 'पाटी आणिली उरल्यासाठी,' असें आपलें अभावात्मकच चित्रण करते झाले. 'अत्यंजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या कवितेंत केशवसुतांनी या सामाजिक विषमतेवर प्रखर प्रहार केलेला आहे, पददलितांच्या जीवनाचें भावात्मक चित्रण म्हणून या कवितेचा निर्देश करणें भाग आहे. १८८८ च्या डिसेंबरांत लिहिलेल्या 'जायाचें जग का असेंच' या कवितेंत कवींच्या आदर्शसृष्टीच्या 'स्वर्गा' च्या कल्पनेला अधिक स्पष्ट स्वरूप मिळालेलें दिसतें.

'...ही दुर्दशा थांबव रे दयेनें,
वा, साधुआणीक असाधु यांचें,
समप्रकर्षी युग आण साचें—'

अर्थात् साधु आणि असाधु यांचा समप्रकर्ष म्हणजेच कवींचा आदर्श 'स्वर्ग' होय, हें यांत स्पष्टपणें मांडलेलें आहे. या दृष्टीने पाहतां आदर्श समाजव्यवस्थेची केशवसुती कल्पना ही मनोराज्यमय (यूटोपियन) होती, असेंच म्हणावें लागतें. 'पुष्पाप्रत' या कवितेंत फुलाला उद्देशून कवी म्हणतात—

'जगांत दुष्ट दर्प जे भरूनि फार राहिले,
तयास मार टाकुनी सुवासजाल आपलें!

सुवास जालाने दर्प मारण्याची ही किमया अजब तर खरीच, तथापि सामाजिकदृष्ट्या तिला दुसराहि लक्षणार्थ आहे. साधूंच्या सद्गुणांनी व सहनशीलतेने असाधूंचे परिवर्तन करण्याचें तत्त्वज्ञानच यांत मांडलेलें दिसून येतें, त्याचप्रमाणे, 'कै. वा. व. पटवर्धन यांस' या कवितेंतहि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'आम्हा शिकीव सुवर्ची सुर व्हावयाला,
पृथ्वीस सांग अमरावति जिंकण्याला ?

यांतील उपदेश कांही त्याहून वेगळा नाही. सद्गुणाच्या प्रभावाने 'सुर होणें', 'अमरावती जिंकणें' म्हणजेच 'स्वर्ग' गाठणें, हें कवींचें सामाजिक तत्वज्ञान आहे. 'समृद्धि आणि 'प्रीति' मधील—

'स्वर्गाला निरयामधून पहिल्या काढूं आम्ही त्या स्थळीं' या ओळींत 'स्वर्गा'ची कल्पना अमर्याद सहवाससुख व जीवनविस्मृति हीच असली व सामाजिक समृद्धि वा सौख्य यांशी तिचा संबंध नसला, तरी 'स्वर्ग' निर्मिणाऱ्या सद्गुणांमध्ये, 'मुलास झोडणाऱ्या पंतोजीस' मध्ये पोपटपंचीची 'मूठभर मृतिका' मुलांच्या 'घशांत कोंबावयास' त्यांचा 'समस्तहि वर्ग' 'झोडपून' टाकणाऱ्या पंतोजीला उपदेशिलेली अनुकंपा व हळुवारपणा, 'रांगोळी घालतांना पाहून' मधील 'कोठे स्वर्गसमक्षता प्रकटते' वगैरे ओळींत 'स्वर्ग' शब्दाने अभिप्रेत होणारी पापभीरुता, शुचित्व, सौन्दर्य, इत्यादि गुणांचा अंतर्भाव कवींनी केलेला आढळतो. अतएव अनुकंपा, पापभीरुता, शुचित्व, सौन्दर्य, बंधुता–वगैरे 'निसर्गा'त दिसणारे गुण मानवी जीवनाला 'स्वर्गा'प्रत नेऊं शकतील, अशी, कवींची समाजपरिवर्तनाची बैठक आहे. मनुष्याने पृथ्वीला 'स्वर्गा'पासून दूर नेलें, म्हणून 'स्वर्गा'ला पृथ्वीवर येण्यास आवाहन केल्याचेंच 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य' या कवितेंतहि निदर्शनास येतें. नंतरच्या थोड्याच अवधींत ख्रिस्ती धर्मावरील श्रद्धेबाबत कवींच्या चरित्रांत जी माहिती मिळते, तिजवरून बायबलमधील विचारप्रणालीच्या प्रभावाचाहि या तत्वज्ञानांत भाग असणें असंभाव्य नाही.

आता, या सद्गुणांच्या साहाय्याने समाजपरिवर्तन होणार, पृथ्वीची पुन्हा 'स्वर्ग होणार' अशी कवींची विचारसरणी असली, तरी या कार्यासाठी कवींची आवश्यकता आहे, असेंहि त्यांचें म्हणणें आहे, कारण कवींची तपश्चर्या व समाजोद्धार यांतूनच 'स्वर्गा' चें आगमन होईल, असें ते 'कवि' (५९) या कवितेंत चौथ्या कडव्यांत ध्वनित करितात—

(कवि) श्वासोच्छ्वास करीं परी नवल हें:—जीवित्वसंहारक
वायू घेउन आंत तो त्यजितसे वायूस त्या पोषक !
राही तो, तर देव भूमिवरती येतात हिंडावया;
जातां, स्वर्ग सवें घरेस उतरे त्यालागि धुंडावया !

अर्थात् या समाजोद्धारांत कवीचें महत्त्व केशवसुतांनी फार गायिलें आहे; कवि हा समाजोद्धाराचा संदेश (मिशन) आणणारा आहे, असें त्यांचें मत दिसतें. 'रूढि, सृष्टि, कलि (?)' या कवितेच्या आरंभीं स्वकृत प्रस्तावनेंत त्यांनी म्हटलें आहे—'रूढि राज्य करीत आहे, तिच्या जुलमी अंमलाखाली लोक नाडले जात आहेत, तरी ते सृष्टीच्या नियमांस अनुसरण्यास नाखूष असून 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी' असली वेडगळ खुळें अलंघनीय मानीत आहेत. लोक ज्याला कलि म्हणून भितात, तो त्यांच्याच बऱ्याकरिता रूढीचा पाडाव करण्यासाठी झपाट्याने ग्रंथप्रसार करीत आहे. तेव्हा लौकरच रूढिअंक्का 'राम' म्हणतील; आणि सृष्टीला लोक भजूं लागतील, असा रंग दिसत आहे.'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाङ्मय ही एक परिवर्तनशक्ति आहे, ही गोष्ट या कवितेंत पहिल्यानेंच सांगितली गेली आहे—

' सृष्टीने निजभृत्य एक बलवान् रूढीवरी प्रेषिला,
त्याला लौकिक मूर्ख हा ' कलि ' अशा नावें म्हणूं लागला !
त्याने कागद घेउनी सहज ते रूढीवरी फेकिले,
त्यांही आसन तें तिचें डळमळूं आहे पहा लागलें ! '

कवितेच्या अखेरीस कवींनी ' सृष्टी ' चा ' जयजयकार ' केला आहे. अन्याय्य रूढींचें व अनाचारांचें उच्चाटन यांची आवश्यकता तींत प्रतिपादलेली आहे.

१८९१ पासून कविमनांत आणखी एक स्थित्यंतर झालें, असें आढळांत येतें. साधूंच्या सदाचाराने वा ' सुवासजालें ' दुष्टांचें दमन होईल, ही कल्पना यानंतर कांहीकाळ मागे पडलेली दिसते. आदर्श समाजव्यवस्थेबाबत ' सृष्टी ' ची वा ' स्वर्गा ' ची मनोराज्यमय (यूटोपियन) कल्पना शेवटपर्यंत कवींनी उराशी बाळगली होती, तथापि भोंवतालच्या समाजाच्या परिवर्तनासाठी अटीतटीने रूढींचें उच्चाटन केलें पाहिजे, ही जाणीव कवींना ' रूढि, सृष्टि, कलि (१) ' या कवितेनंतर जास्तच स्पष्ट रीतीने होत चाललेली दिसते. वंडखोर केशवसुतांच्या आगमनाचे डोहाळे यानंतर काव्यदेवतेला होऊं लागल्याचें पाहून मार्मिक समालोचक आशेनें प्रेरित होत्साता पुढील कवितांकडे वळूं लागतो.

' तुतारी ' ची पूर्वतयारी

१८९१ नंतर प्रतीकवादाचा थोडाबहुत अंगीकार करायला केशवसुतांनी सुरवात केली. नव्या युगाचें प्रतीक म्हणून ' तुतारी ' ची कल्पना त्यांच्या कांही कवितांतून एव्हानंतरच व्यक्त झालेली आढळते.

' अम्हां भ्रामिष्ट बालकांस काव्यदेवतेचिया
जीव निर्जिवांतलाहि नेमिलें पहावया '

असें नव्या कवित्वाच्या जाणिवेने ' पुष्पाप्रत ' (४१) या कवितेंत सांगितल्यावर ' कवितेचें प्रयोजन ' (४२) या कवितेंत—

' हातीं घेउनिया निशाण कवि हा पाचारितो बांधवां
या हो या झगडावयास सरसे व्हा, मेळवा वाहवा
प्रेतेंही उठवील जी निजरवें ती तो तुतारी करीं
आता नादवती '

असा पुकार कवि करूं लागले. आता कवि निशाण घेऊन तुतारी फुंकणारे समाजपरिवर्तनाचे पाईक म्हणून गर्जू लागले. त्याचबरोबर 'स्वर्गा'पासून दूर गेल्यामुळे मानव दुःखी झाले, असें म्हणून मनोराज्यांत दंग होण्याऐवजीं ते

' आता जात असे दुरी शिथिलता अस्मत्समाजांतुनी
त्याची खूणच गान जें निघतसे तें साच जाणा मनीं;

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अशा रीतीने बदलत्या समाज घटकांची दखल घेऊं लागले. प्रस्थापिताचे अभिनिवेशी व परिवर्तनाचे पाईक असे दोन विरोधी तट अटीतटीच्या सामन्यासाठीं भिडलेले केशवसुतांना दिसूं लागले, हाच याचा अर्थ होय. यापेक्षाहि अधिक बहार ' पर्जन्याप्रत ' (६१) या कवितेंत दिसून येईल. ही पूर्णपणें प्रतीकात्मक कविता आहे. पर्जन्य= सामाजिक स्थित्यंतर, मुंग्या= सामान्य अन्यायग्रस्त जन व पंख फुटणें= जागृति होणें, बंधमोचन होणें; अशा तीन आधारांवर कवींनी कवितेची इमारत उभवलेली आहे. ५ व्या कडव्यांत.—

' भेटायास तुला समुत्सुक अशा मुंग्या उडूं लागती;
पर्जन्या ! तर ये ! कृषीवल तुझ्या मार्गाप्रती ईक्षती.
झंझावात ह्यावरी बसुनिया, या पश्चिमाब्धीवरी
लाटा झोडित गर्जना करित ये, बा मेघराजा तरी. '

झंझावातावर आरूढ होऊन अब्धीवर लाटा झोडीत गर्जत येण्यासाठी पर्जन्याचें केलेलें हें आवाहन वाचलें म्हणजे तांब्यांच्या ' रुद्रास आवाहना 'ची आठवण झाल्यावाचून राहात नाही ! खरा केशवसुती प्रखर आवेश व्यक्त होऊं लागतो तो अशा ठिकाणींच. ही कविता कवींच्या अत्युत्कृष्ट कवितांत गणायला प्रत्यवाय नाही. सामाजिक स्थित्यंतर हवें, तर झंझावात येणारच; गर्जना, लाटा, या येणारच; त्यांना भिऊन समाजाची गति थोपवतां येत नाही, हा आशय कवींनी मोजक्या शब्दांत ओजस्वी रीतीनें प्रतिपादलेला असल्यामुळेच प्रस्तुत कवितेंत एवढा आशावाद, एवढा झुंझारपणाचा आवेश स्थित्यंतराच्या आवाहनांतील उदात्तता व विध्वंसनाची एवंच नवनिर्माणाची अपूर्वाई या गोष्टी अनुभवास येतात.

याचबरोबर कवींच्या ठायीं आत्मलक्षित्वाचा प्रादुर्भाव होत होता. वैयक्तिक हालअपेष्टांचा सामाजिक विषमतेशी संबंध असल्याची जाणीव झाल्यामुळेच वैयक्तिक व सामाजिक अशा दुहेरी भूमिकेवरून कवि ' पुष्पाप्रत ' (६५) या कवितेंत ' चिर तरुणा रे ! चिररुचिरा रे ! ' इ. उद्गारांतून चिरसौंदर्य, चिरतारुण्य इ. गोष्टींची उपासना करतांना दिसतात—

' काळोखाच्या जगामधें या
मृत आशांच्या चितांवरुनिया
पिशाच माझें भटकत आहे—शांति नसेचि तया ! '

ही स्वताची दशा, तर पुष्पाची ' चिरतरुण ' व ' चिररुचिर ' अशी अवस्था. म्हणून ' तुजमजमध्यें परी केवढी आहे दंद दरा रे ! ' असे उद्गार कवींनी काढले आहेत. एवढेंच नव्हे, तर

' मच्चित्ताच्या क्षितिजावरती
नृत्याला जीं स्वप्नें करिती
निदान, त्यांच्यामध्यें मजला भासो तव मूर्ति ! '

असें म्हणून वैयक्तिक व सामाजिक स्थित्यंतराच्या प्रयत्नांत परिपूर्ण पुष्पाची मूर्ति मला दिसत राहो व त्यामुळे मला शांति मिळो, अशीहि आमना व्यक्त केलेली आहे. कोणतीं स्वप्नें कवींच्या मनांत नर्तन करीत होतीं ? ' स्वर्गा 'चीं ? ' सृष्टी 'चीं का चिरंतनत्वाचीं ?—येथवर केलेल्या विवेचनावरून या प्रश्नांचीं उत्तरें सहजगत्या मिळूं शकतील; कारण हीं स्वप्नें दुसरीं कोणतींच नसून पृथ्वीचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सुरलोक ('स्वर्ग') करण्याचींच होत. कारण 'क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास' (७६) या कवितेंत केशवसुत म्हणतात,

'हा हा ! हे जो सर्व भास धरतां येतील मातें तर
पृथ्वीचा सुरलोक कीं बनवुनी टाकीन मी सत्वर.' (२४ मार्च १८९३)

'पण लक्ष्यांत कोण घेतो—च्या कर्त्यास' या कवितेंत स्त्रियांच्या गुलामगिरीवर, पर्यायानें सामाजिक अन्यायांवर प्रखर हल्ला चढविणारे केशवसुत समाजाच्या उदात्तीकरणासाठी समाजाचा 'स्वर्ग' बनवण्यासाठींच, धडपडत होते. २४ मार्च १८९३ रोजीं लिहिलेल्या वरील 'दिव्य भासा' विषयीच्या ओळींनंतर चारच दिवसांनीं त्याच ध्येयानें प्रेरित होऊन नीं त्याच मनोऽवस्थेंत कवींनी मुंबईस २८ मार्च १८९३ रोजीं 'तुतारी' ही कविता लिहिली. 'तुतारी'च्या पूर्वतयारीचें फळ अशा रीतीनें पूर्णत्वास आलें. पृथ्वीचा-सुरलोक करण्यासाठी रूढींचा उच्छेद करण्याचा संदेश देण्यासाठींच 'तुतारी' ही कविता लिहिली गेली. कदाचित् मुंबईतील वास्तव्य कवींच्या संस्कारक्षम मनाला जास्त प्रोत्साहक ठरलें असेल. मुंबईमच केशवसुतांचें युगप्रतिनिधिक काव्य अवतीर्ण झालें. 'सुरलोक', 'स्वर्ग', 'देव' वगैरे कल्पना 'तुतारी' कवितेंतहि आलेल्या आहेत. तेव्हां आरंभीच्या त्याच शब्दांचा 'तुतारी' पर्यंत झालेला अर्थविकास फार महत्त्वाचा, कविमनावरील संस्काराचा निदर्शक आहे. निसर्गप्रेमांत व 'स्वर्ग' चिंतनांत मग्न राहणारे केशवसुत 'तुतारी'त केवळ झिरझिरीत आकृतीनें आढळांत येतात. प्रस्थापित व उदयोन्मुख यांचा लढा अपरिहार्य आहे, याची जाणीव या वेळेस त्यांना पुरेपूर झाली होती.

'पूर्वीपासूनि अजुनि सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती,
देवांवर झेंडा मिरवीती,
देवांच्या मदतीस चला तर !'—

अर्थात 'सुर' व 'असुर' हे या वेळेस कविकल्पनेंतील संकेत राहिलेले नव्हते. सुष्ट नर व दुष्ट नर असेच यांचे साधे अर्थ कवींना अभिप्रेत दिसतात; किंबहुना, अधिक स्पष्टपणें सांगायचें झाल्यास, अन्याय रूढींचे पाठीराखे ते असुर व न्यायी समाजाचारांचें पुरस्कर्ते ते सुर अशीच कवींची मांडणी दिसते. सामाजिक विषमतेविरुद्ध लढा पूर्वीपासून चालत आला आहे, पण आज दानवांचा—दुष्टांचा—पूर्ण अंमल चालत आहे, म्हणून समाजास्थित्यंतरासाठी दलितांच्या बाजूनें लढू या, असा आदेश कवि देत आहेत. एतावता देव, सुर, सुरलोक हे 'तुतारी' मधील शब्द केवळ आलंकारिक अर्थांचे आहेत, यांत शंका नाहीं. 'देवांच्या मदतीस' जाणें यांतील अभिप्राय 'समाजसुधारकांच्या आघाडीस जाऊन मिळणें व सामाजिक अन्यायांविरुद्ध लढणें', असाच घ्यावा लागेल.

'लोकहितवादी' नी अन्यायमूलक रूढीमुळे व भेदाभेदांमुळे हिंदु समाज कसा विस्कळीत झालेला होता, याचें विदारक चित्रण 'शतपत्रां' तून केलें. लोकहितवादी—वगैरे मंडळी झाली तरी केशवसुती युगाची पूर्व तयारी करणारे पाईकच. रूढींच्या अन्यायांमुळे, भेदाभेदादि दंभामुळे, खोट्या बुरसट कल्पनांमुळे समाजांतील 'संघशक्ति' मोडून पडली आहे, असें 'तुतारी' त केशवसुतांनी स्पष्टपणें प्रतिपादन केलें आहे.—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘ संघशक्तिच्या भुईत खंदक
रूंद पडुन शें तुकडे झाले.....
......पाहिजेत ते सत्वर भरले;
ध्या त्यांत उड्या तर त्रैलोक्य!

ही ‘ संघशक्ति ’ म्हणजे समाजधारणा, समाजाचें सांघिक जीवन. (‘ वर्गीय संघशक्ति ’ या आजच्या शब्दांचा याच्याशी घोटाळा होऊं नये.) आणि समाज छिन्नभिन्न करणाऱ्या जातिभेद, वर्णभेद, श्रेष्ठकनिष्ठभेद, अन्यायमूलक रूढि, विषमतामूलक आचारविचार वा खोटीनीति, यांचा उच्छेद कवींना ‘ तुतारीं ’त अभिप्रेत आहे. पर्यायाने, सरंजामदारी समाजरचनेवर कवींनी फार मोठा हल्ला चढण्याचा आदेश ‘ तुतारी ’ फुंकून दिला आहे.

‘ नियमन मनुजासाठी, मानव
नसे नियमनासाठी, जाणा; ’

या उद्गारांचा रोख व्यक्तिस्वातंत्र्याच्या बाजूने आहे. हा वरील तत्त्वज्ञानाचाच भाग असून भांडवली (बूर्झ्वा) अर्थमूल्यांतून निर्माण झालेला आहे. पूर्वीच्या स्वामिभक्तीच्या जागीं राष्ट्रीयतेची व रूढिदास्याच्या जागीं व्यक्तिस्वातंत्र्याची प्रतिष्ठापना याच युगांत होत असते. ‘ The Bourgeoisie also creates its own bourgeois thought and literature ’—हेंच खरें.

बूर्झ्वा (भांडवलदारी) अर्थव्यवस्थेच्या प्रस्थापनेच्या काळांतील पूर्वीच्या सरंजामदारी समाजव्यवस्थेतून सुटूं पाहणाऱ्या नव्या मुमुक्षु सामाजिक मनाच्या स्वोत्कर्ष, स्वोन्नति वगैरे आकांक्षांची अभिव्यक्ति केशवसुतांच्या ‘ निशाणाची प्रशंसा ’ (१११) या कवितेंत फार चांगल्या रितीने झालेली आहे. सरंजामदारी व्यवस्थेचें (खरें पाहतां अव्यवस्थेचें) उच्चाटन करण्यासाठी उंचावलेल्या निशाणास कवि म्हणतात—

‘ म्हणून मानवचित्ताची उंचावर जी धाव
तीचें चिन्हच तू, तुजला निशाण सार्थच नाव ’

सरंजामशाहीमुळे खुरटलेल्या, दबलेल्या व रोगट बनलेल्या मनांची या नव्या युगांत बंधमोचनाच्या जोषांत उंचावर धाव सुरू झाली. मग प्रभावी कवि गुलामगिरीचे व रडतराऊपणाचे उद्गार कसा काढील!

‘ मिळमिळीत ज्याची कविता न असें रंडागीत, असें अभिमानाने म्हणून केशवसुतांनी नव्या कवित्वाचा डंका गाजवला आहे.

अनादि काळापासून मानवाला मृत्यूचें भय वाटत आलें आहे. या भयामुळेंच जगांतील करुणरसात्मक वाङ्मयाचा बहुंश प्रत्यक्ष वा पर्यायाने लिहिला गेल्याचें सूक्ष्म विचारान्तीं दिसून येईल. पण केशवसुतांच्या समकालांत आयुष्यांतील घटक अशा कालावर्षांचें फार महत्त्व वाटूं लागलें. वेळेचें महत्त्व प्रतिपादणाऱ्या ‘ घड्याळ ’ (८९) या त्यांच्या कवितेंत याची प्रचीति मिळेल. त्याचप्रमाणें, १८९१ नंतर त्यांनी अंगीकारिलेल्या प्रतीकवादाचें प्रत्यंतर देणाऱ्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'धूमकेतु आणि महाकवि' या कवितेंत सरंजामदारी समाजरचनेचा विध्वंस करणाऱ्या महाक्रांतीचा उद्गाता म्हणून महाकवीचें महत्त्व त्यांनी गायिलेलें असून त्याची धूमकेतूशी तुलना करण्याचा प्रयत्न केला आहे—

'जगांतिल महाक्रांतीचें तें भविष्य सांगाया
तुम्ही येतसां······'

'विद्यार्थ्यांप्रत' (८५) या कवितेंतहि नव्या जमान्यांतील बूर्ज्वा शिक्षणाचें त्या काळच्या मानाने महत्त्व सांगण्यास कवि विसरत नाहीत. अपल्या विद्यार्थ्यांस ते म्हणतात—

'परि अेक अेक जो शब्द नवा तूं शिकसी
शक्ति तयाची उलथिल सर्व जगासी!'—

वाङ्मय, ज्ञान इ० शक्तींचा नव्या जमान्याच्या प्रस्थापनेसाठी मोठा उपयोग असल्याची मागील कांही कवितांतून दिलेली जाणीवच याहि उद्गारांत अनुस्यूत आहे; एवढेंच नव्हे, तर 'बाबा, जग हें बदलायाचें' या ठाम सिद्धांताची खूणगाठ बांधून ठेवण्याबद्दल विद्यार्थ्याला बजावण्यास ते विसरले नाहींत.

सरंजामदारी युगाच्या तटबंदी उध्वस्त करून त्याची अभिनिवेशी महाभागांची दाणादाण करण्यासाठी कंबर कसलेल्या केशवसुतांना त्या ऐकाच गोष्टीचा या काळांत ध्यास लागून राहिला होता. राष्ट्रीयता, व्यक्तिस्वातंत्र्य आचारस्वातंत्र्य,—वगैरे नव्या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी ते वेडे, बेहोष, झाले होते. या बेहोषपणाची साक्ष 'स्फूर्ति' (९१) या कवितेंत पटते.

'काठोकाठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ... ...'
'परिसुनि त्यांचे शब्द, रूढिचे दास झणीं ते खवळूं द्या'

इतर सामाजिकांना 'जिव्हेचीं बंधनें सैल करा' असा आदेश देऊन कवि स्वत: युगानुयुगें बद्ध करण्यांत आलेल्या जिव्हेस सैल सोडून, परंपराप्राप्त नरकतुल्य समाजाचारांत आनंद मानणाऱ्या 'रूढींच्या दासां'ना डिवचण्याचें धैर्य करते झाले; नव्या बुद्धिवादानें खणखणीत समर्थन करणाऱ्या आगरकरांसारख्या सुधारकांच्याच धैर्यानें ते सरंजामशाहींतील प्रत्येक समजुतीवर आचारविचारावर, रूढींवर, धर्मकर्मांवर व सामाजिक कल्पनांवर प्रहार करायला पुढे सरसावले. 'देवदानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कळवूं द्या'. केशवसुतांच्या सर्व काव्यरचनेंत ही ओळ अत्युत्कृष्ट अशी आहे. तशी ओळ त्यांनी अगोदर वा नंतरहि दुसरी लिहिलीच नाही वा त्यांच्या काळांतल्या कोणत्याहि कवीने लिहिलेली नाही. अशा मानवनिर्मित देवांची काय प्राज्ञा की, समाज स्थित्यंतराच्या आड ते येतील! आल्यास जसे ते आम्हीं निर्मिलें, तसेंच नष्टसुद्धा करूं, असा कवींचा अभिप्राय पुढील ओळींत व्यक्त झालेला आहे—

'अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशी निकरीं,
हार न खाऊं रतीभरी!' ह्याच झुंझारपणाच्या आवेशांत—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देतांनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे'

अशी गर्जना कवींनी केली आहे. बदललेल्या आर्थिक व सामाजिक मूल्यांमुळे जुन्या मूल्यांची सद्दी धामधुमीनें, महाक्रांतीच्या घनगर्दीनें, उलट्न लावण्याचा हा निर्धारच केशवसुतांना बंडखोर या पदवीवर हक्क मिळवून देता झाला.

• • •

होतां विशाल जीवन—

हिरे माणिक मोत्यांचा
चित्तीं तुपजला हेवा!
नक्षत्रांच्या वैभवाचा
माझ्या मनाला विसावा! १

वस्त्रें अमोल मोलाचीं
भरजरि पीतांबर!
तुच्छ सर्व हीं जीवाला
वृत्ति होतां दिगंबर! २

माझें भूमिचें आसन
शुभंकर, चिरंतन!
कसें लोभविल माझें
मन राजसिंहासन! ३

विभवाचें नि सुखाचें
असें उघडें भांडार!
होतां विशाल जीवन
सुखमय हा संसार! ४

—ना. मा. सरपटवार.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यसमालोचन

संपादक

के. भि. ढवळे यांचीं तीन प्रकाशनें

१. पर्तेव्हा (ले. आ. रा. देशपांडे; प्र. के. भि. ढवळे, श्रीसमर्थ सदन, मुंबई ४. किं. रु. ४) सुप्रसिद्ध कवि आ. रा. देशपांडे ऊर्फ 'अनिल' यांचीं अठ्ठावीस भावगीतें व दहा मुक्तछंदांतील कविता या पुस्तकांत संगृहीत केलेल्या आहेत. अनिल हे उच्च प्रतीचे कवि असल्याबद्दल त्यांचा लौकिक आहे व त्या लौकिकास साजेल असाच हा संग्रह आहे.

भावगीतांपैकीं 'हाक,' 'चिरयौवन,' 'वाट'— या कविता व मुक्तछंदांतील रचनेपैकीं 'प्रेम आणि जीवन,' 'सुप्त ज्वालामुखी'— या कविता उत्कृष्ट आहेत. इतरहि कवितांची पातळी वरच्या दर्जाची आहे.

अनिल हे अलीकडे व्यक्तिगत भावनेच्या आवर्तांतून सुटूं पाहत आहेत. याची खूण म्हणजेच त्यांच्या या मुक्तछंदांतील कविता होत. या कवितांवरून त्यांची व्यापक सहानुभूति व्यक्त होते. या कविता कित्येकांस 'पोषाखी' वाटतात, असें दिसतें, पण मला तसें वाटत नाहीं. उलट अनिलांच्या प्रतिभेस हा नवा पैलू पडला आहे, असेंच समजावयास पाहिजे. मुक्तछंदांतील या कवितांत भावनेपेक्षा विचारास प्राधान्य देण्यांत आलें आहे व त्यांतील भाषा गद्याच्या जवळ आली आहे, म्हणूनहि कुणी नाराज असलेले दिसतात, पण या दोन्ही गोष्टींस निदान माझी तरी मुळींच हरकत नाहीं, इतकें म्हटलें, म्हणजे पुरें.

'प्रिति तुझी माझी', 'प्रभात तारा' यांसारख्या कवितांत वृत्तां (Metres) ची भेसळ दिसते. तिची कवींस जाणीव असल्याचें टिपणांवरून दिसलें, तथापि तेवढ्यावरून ही भेसळ समर्थनीय ठरत नाहीं! दोन भिन्न वृत्तांची भेसळ कांहीं एका धोरणानें-शिस्तीनें-व्हावयास पाहिजे. केशवसुतांची 'माझा अंत' कविता या दृष्टीनें नमुनेदार आहे. अनिलांच्या या कवितांचा असा प्रकार नाहीं. यामुळें हें वृत्तवैचित्र्य नसून शैथिल्य होय, असेंच म्हणणें प्राप्त आहे! बाकी वृत्तशैथिल्यांतच कवि-प्रतिभेचा साक्षात्कार (!) पाहण्याच्या या जमान्यांत हा मुद्दा व्यर्थच ठरणार आहे म्हणा!

टिपणांत क्वचित् चुका दिसतात: 'आरास' कवितेंतील अंतरा दोह्यांत आहे, असें टिपणांत सांगितलें आहे. पण 'हसऱ्या पुष्पांची' हा अंतरा दोह्यांत नसून साकीमध्ये आहे!

तें कांहीं असो, 'पर्तेव्हा' हा काव्यसंग्रह एकंदरीनें उच्च प्रतीचा ठरतो, हें नमूद करावयास मला आनंद वाटतो व त्याबद्दल मी अनिलांचें मन:पूर्वक अभिनंदन करतों.

२. केशवसुत (ले. प्रा. रा. श्री. जोग. किं. रु. ६॥) आधुनिक मराठी कवि-कुल गुरु केशवसुत यांच्या कवितांचें सर्वांगीण विवेचन करणारा हा ग्रंथ सुप्रसिद्ध टीकाकार व कवि प्रा. जोग यांनी लिहिला आहे. जोग हे जसे रसिक कवि आहेत, तसेच, ते संयमपूर्ण टीका करणारे काव्यविवेचकहि आहेत, यामुळे त्यांचा हा ग्रंथ आदर्शभूत झाला आहे, असें म्हणण्यास मला कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं. केशवसुतांचें जीवनचरित्र आरंभीं देऊन त्यांच्या कवितांचें जोगांनी वर्गीकरण केलें आहे व वर्गीकरणानुसार बहुतेक सर्व प्रमुख कवितांचा त्यांनी रसग्रहणपर परामर्ष घेतलेला आहे. प्रा. जोग यांनी केशवसुतांच्या कवितेंतील गुण व दोष दोन्ही नि:पक्षपातपणानें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दाखविले आहेत; आणि, केशवसुतांच्या माडखोलकरादिकांसारख्या आक्षेपकांचा संयमाने, पण स्पष्टपणें समाचारहि घेतलेला आहे. तात्पर्य, केशवसुत व त्यांची कविता यांच्या संबंधीं जेवढ्या गोष्टी अशा स्वरूपाच्या ग्रंथांत याव्या, अशी अपेक्षा आपण बाळगली असती, तेवढ्या सर्व या ग्रंथांत आलेल्या आहेत, यांत शंका नाही. मग या ग्रंथास 'आदर्शभूत टीकाग्रंथ' असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति कशी होईल ?

नवलाची गोष्ट ही की, प्रस्तुत ग्रंथावर प्रतिकूल अभिप्रायच अधिक आलेले दिसतात ! केशवसुतांच्या कवितेवर यापूर्वी भल्या-बुऱ्या स्वरूपाची इतकी चर्चा झाली आहे की, त्यांच्या संबंधींच्या ग्रथांत इत:पर नवीन मुद्दे मांडण्यासारखे क्वचितच राहिलें असतील. अर्थात् जोगांच्या या ग्रंथांत 'नवीन' असें फारसें कांहीं दृष्टोत्पत्तीस न आल्यास त्याचा दोष त्यांजकडे कसा जाऊं शकतो, हें मला कळत नाही ! हा जाणूनबुजून संकलनपर ग्रंथ होय व त्याजकडे त्याच दृष्टीने पाहिलें पाहिजे. तसें केल्यास वाचकांच्या पदरीं निराशा पडणार नाही, हें उघड आहे.

नावीन्य शोधणारे जसे या ग्रंथावर तुटून पडले, तसेच कांहीं 'लोक विलक्षण' मतें बाळगणारेहि त्यावर सपाटून 'घसरले !' एकजणास मुळी 'वर्गीकरणा'चेंच वावडे आहे !! तेव्हा जोगांनीं केशवसुतांच्या कवितांचें 'वर्गीकरण' केल्याबद्दल त्यांचें पित्त खवळल्यावाचून कसें राहील ? कित्येकांनी या ग्रंथाविषयीं पराकाष्ठेच्या कटुतेने का लिहावें, याचें आकलन मात्र मला खरोखरीच होत नाही !

जोगांच्या या ग्रंथांतील सर्वच मतें मला मान्य आहेत, असें नाही. अशा मतांचा मी अन्यत्र परामर्षहि घेतलेला आहे. पण याचा अर्थ असा खचित नव्हे की, हें सर्व पुस्तकच त्याज्य आहे !

केशवसुतांची कविता समजावून घेऊं इच्छिणाऱ्या सर्वसामान्य वाचकांस हा ग्रंथ खात्रीने मार्गदर्शक होईल, असें माझें प्रांजल मत आहे.

३. पाच कवी (ले. प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, किं. रु. २॥) प्रस्तुत ग्रंथांत केशवसुत टिळक, विनायक, गोविंदाग्रज व बालकवि यांच्या निवडक कविता टीपा–टिप्पणीसह ग्रथित केलेल्या आहेत. हे सर्व कवि नामवंत असून त्यांच्या निवडक कविता म्हणजे मराठी भाषेचीं दिव्याभरणेंच होत. प्रा. राजाध्यक्ष हे अत्यंत रसिक असे लेखक असल्यामुळे त्यांनी त्या त्या कवींविषयीं लिहिलेला परिचय–लेख, कवितांवरील टीपा व आरंभींची प्रस्तावना–हीं सर्व अतिशय वाचनीय उतरलीं आहेत. या गद्य मजकुराकरता तरी हें पुस्तक सर्व काव्यभक्तांनी एकवार अवश्य नजरेखालून घालण्यासारखें आहे.

प्रा. राजाध्यक्ष यांनी विनायकांचा एकेरी उल्लेख करून त्यांच्या काव्यसंग्रहाचे संग्राहक कै. अनंततनय यांचें अनाठायीं अनुकरण का करावें, याचा बोध होत नाही ! क्वचित् टीपा सदोष आहेत. बालकवींच्या 'औदुंबर' कवितेची जाति लवंगलता दिलेली आहे, 'ती समुदितमदना' पाहिजे. मजपुढे असलेल्या आवृत्तींत मुद्रणदोषांनी तर कहर केला आहे !

हे दोष वगळल्यास प्रस्तुत पुस्तक विद्यालयीन अभ्यासक्रमांत अवश्य समाविष्ट होण्याजोगें आहे. सर्वसामान्य काव्यरसिकांसहि तें उद्‌बोधक वाटेल.

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण्याचा हाच एकमेव उपाय होय. त्यांचा पार्थिव देह पंचत्वांत विलीन झाल्याबद्दल वाटणारा दु:खावेग आवरून सर्वांनी या मार्गाचें अनुसरण केलें पाहिजे, म्हणजेच त्यांच्या आत्म्यास चिरशांति प्राप्त होईल!

याहून यावेळीं अधिक लिहवत नाही. आणि लिहून उपयोग तरी काय!

मुकुंदराजाचें जन्मस्थान कोणतें?

गोंदिया येथील विदर्भ–साहित्य–संघाचें अधिवेशन ७ व ८ मार्च रोजीं भरण्याचें निश्चित झालें आहे. याप्रसंगीं 'विवेकसिंधू' चा कर्ता मुकुंदराज यांचें जन्मस्थान कोणतें असावें, यासंबंधीं नवीन प्रकाश टाकणारा लेख कोणी लिहून पाठविल्यास त्याला 'युगवाणी'त अवश्य स्थान देण्यांत येईल.

भवभूतीचें स्मारक उभारा!

गोंदियाजवळ महाकवि भवभूति याचें 'पद्मपूर' गांव असल्याचा शोध प्राचार्य मिराशी यांनी लावलेला आहे आणि तो विद्वन्मान्यहि झाला आहे. या पद्मपुरास त्या थोर विभूतीचें स्मारक उभारलें जाणें आवश्यक आहे. आपल्या प्रांताचे बांधकाम खात्याचे मंत्रि डॉ. बार्लिंगे हे स्वत: व्यासंगी विद्वान् आहेत. त्यांनी मनावर घेतल्यास पद्मपुरास भवभूतीचें असें स्मारक उभारणें कठीण नाही. तरी त्यांना अशी आग्रहपूर्वक विनंति आहे की, त्यांनी गोंदिया–संमेलनाच्या प्रसंगीं हें कार्य पार पाडण्याचा संकल्प जाहीर करावा.

• • •

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104/Genl I A अन्वयें ' युगवाणी ' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

'रीटा' मुळे आकर्षक केस-उगवतात

केससमृद्धीसाठीं ' रीटा ' हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्रवणास त्याने पोषण होते. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठीं तें उत्तम आहे. ' रीटा 'ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळते. ×

RITA

HAIR TONIC

उत्तर हिंदुस्थानी सिनेतारका तुम्हाला काय सांगतात ?

ललिता पवार:-ज्यांना उत्तमपैकीं केशवर्धक हवें असेल, त्यांना मी "रीटा" वापरून पहाण्याची शिफारस करतें. आणि, मला खात्री आहे कीं, यावरून आपली मातृभूमि किती उत्तमोत्तम वस्तू तयार करूं शकते, हें त्यांना कळून येईल.

शारदा जुन्नरकर:-मी माझ्या केसांसाठीं "रीटा" वापरण्यास सुरवात केली. त्यायोगें माझे केस जाण्याचें जादूप्रमाणें थांबलें. 'रिठ्यां' त केस नरम करणारीं व त्यांना रेशमाप्रमाणें तकाकी आणणारीं अनेक द्रव्यें असून मी खात्रीपूर्वक म्हणूं शकतें कीं, "रीटा" हें एक अद्भुत केशवर्धक आहे.

के. ईश्वरलाल:-मी एकदां "रीटा" वापरलें व त्यानंतर माझ्या कुटुंबातील सर्वत्र मंडळींना "रीटा" वापरण्याची सवयच लागली. माझ्या मित्रांना केशवर्धकांमध्ये "रीटा" हेंच पसंत पडेल ही खात्री आहे.

व्हेटो कंपनी, जोन्स् स्ट्रीट मद्रास,

द. ना. ठाकूर यांनी टाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ' युगवाणी ' कार्यालय १९/४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ